निर्मातु शिवं सुंदरम्

# ताराराणी विद्यापीठ

राजारामपुरी, कोल्हापूर.



## ६४ वा वार्षिक अहवाल

सन २००९-२०१०

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

संस्थापक

**मा. कै. डॉ. व्ही. टी. पाटील**

सन्माननीय अध्यक्ष

**मा. श्री. रामराव स. बेनाडीकर**

१) मा. श्री. रा. कृ. कणबरकर...................... कार्यकारी अध्यक्ष

२) मा. डॉ. एस्. एन्. पवार ........................ उपाध्यक्ष

३) मा. ॲड. पी. एम्. हिलगे....................... उपाध्यक्ष

४) मा. श्रीमती राजलक्ष्मी आ. जाधव ............ उपाध्यक्षा

५) मा. श्री. उत्तमराव गो. काळे ................... सदस्य

६) मा. श्रीमती व्ही. पी. निकम-पाटील .......... सदस्या

७) मा. श्री. अशोकराव आर. पर्वते................ सदस्य

८) मा. श्री. प्राजक्त क्रां. पाटील .................. सदस्य

९) मा. प्रा. चंद्रकांत शं. पाटगांवकर .............. सदस्य

१०) मा. डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील.................. सेक्रेटरी-पद्धसिध्द सदस्य

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

के. ई. ९९

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

ताराराणी विद्यापीठाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक १३/१२/२०१० या दिवशी दुपारी ठीक ४.०० वाजता ताराराणी विद्यापीठाच्या पश्चिमेकडील इमारतीमध्ये आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### :: सभेपुढील विषय ::

१) मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) संस्थेचा सन २००९-२०१० सालचा वार्षिक अहवाल व सन २००९-२०१० या वर्षाची हिशोबपत्रके मंजूर करणे.

३) ऑडिटर्स यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या कामांचा विचार करणे.

येणे प्रमाणे असे,

**डॉ. क्रांतिकुमार पाटील**
सचिव

**मा. रा. कृ. कणबरकर**
कार्यकारी अध्यक्ष

कोल्हापूर
दिनांक : ११/११/२०१०.

---

**सूचना :**

अहवाल आणि ताळेबंदासंबंधी ज्यांना माहितीवजा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले लेखी प्रश्न संस्थेच्या ऑफिसमध्ये दिनांक ३/१२/२०१० पर्यंत पाठवावेत.

# श्रद्धांजली

१) श्री. विंदा करंदीकर - ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त श्रेष्ठ साहित्यकार

२) श्री. राम शेवाळकर - संत साहित्याचे गाढे अभ्यासक व साहित्यिक

३) श्रीमती सुनिता देशपांडे - प्रख्यात लेखिका

४) श्री. बाबा कदम - प्रख्यात लेखक

५) श्री. दिलीप पुरुषोत्तम चित्रे - आंतरराष्ट्रीय ख्यातीचे साहित्यिक

६) श्री. निळू फुले - चतुरस्त्र अभिनेते व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते

७) श्री. चित्तरंजन कोल्हटकर - नटश्रेष्ठ

८) श्री. मोहन वाघ - ज्येष्ठ नाट्य निर्माते

९) श्री. विश्वनाथ राजाराम पाटील - संस्थेचे माजी विश्वस्त व आजीव सभासद

१०) श्रीमती एस. जी. शिरगोपीकर - संस्थेच्या माजी विश्वस्त व आजीव सभासद

!! निर्मातुं शिवं सुंदरम !!

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

# ६४ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

ताराराणी विद्यापीठाचा सन २००९-२०१० चा ६४ वा वार्षिक अहवाल व हिशोब-पत्रके आपणापुढे सादर करताना विशेष आनंद होत आहे. अहवाल साली संस्थेत आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत.

**विविध कार्यक्रम :**

ज्ञानाचे पवित्र कार्य करण्यासाठी स्थापन झालेल्या ताराराणी विद्यापीठात शिक्षणेत्तर अन्य उपक्रमही तितक्याच तन्मयतेने राबविले जातात.

**स्व.ती.सौ.सरोजिनीदेवी तथा काकीजी यांची पुण्यतिथी :**

प्रथम सत्रात संस्थेच्या माजी उपाध्यक्षा, कै. सौ. सरोजिनीदेवी तथा पूज्य काकीजी यांची पुण्यतिथी त्यांच्या त्यागाचे चिरंतन प्रतीक असलेल्या ताराराणी विद्यापीठ व विविध शाखांनी शनिवार,दि. १८/७/२००९ या दिवशी साजरी केली. या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्यावतीने सर्व शाखातर्फे यादिवशी प्रसिध्द वक्त्या, मा. प्राचार्या, श्रीमती एम. एस. पाटील-बडदरे यांचे "स्त्री वियषक कायदे-सामाजिक मानसिकता" या विषयावर व्याख्यान आयोजित केलेले होते.

**कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची जयंती :**

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठ, गारगोटी या संस्थांचे संस्थापक, कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा पूज्य काकाजी यांच्या १०९ व्या जयंती निमित्त रविवार, दिनांक २६ जुलै २००९ यादिवशी संस्थेच्या शाखांमधून विविध उपक्रमांचे आयोजन करुन जयंती साजरी करण्यात आली.

**भवानी महोत्सव :**

ताराराणी विद्यापीठात प्रतिवर्षी 'भवानी महोत्सव' साजरा केला जातो. अहवाल साली भवानी महोत्सव प्रारंभ शनिवार, दिनांक १९/०९/२००९ यादिवशी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द उद्योगपती मा. श्री. व्ही. एन. देशपांडे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शुभदा देशपांडे यांच्या शुभहस्ते "घटस्थापना" करुन करण्यात आली. तसेच या भवानी उत्सवामध्ये "ललित पंचमी" आणि "मातृदिन" ही साजरा करण्यात आला.

**कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा स्मृतिदिन :**

कै.डॉ.व्ही.टी.पाटील तथा पूज्य काकाजी यांच्या चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त रविवार दि. १७ जानेवारी २०१० या दिवशी आयोजित केलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द वक्ते मा. प्राचार्य पी. बी. पाटील हे उपस्थित होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय ''शिक्षण क्षेत्रातील बदलती मूल्ये'' असा होता. त्यांच्या हस्ते ताराराणी विद्यापीठाचा 'ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार' श्रीमती जयश्री दानवे (उषाराजे हायस्कूल) यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुरस्काराची रक्कम रुपये ५,०००/- असे आहे.

**तुकाराम बीज कायर्क्रम :**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांची पुण्यतिथी प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही रविवार,दिनांक ७/३/२०१० यादिवशी साजरी करण्यात आली. समाजप्रबोधनपर अशा या सांस्कृतिक कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री. धनराज वंजारी, सहा. पोलीस आयुक्त, ब्रहन्मुंबई हे उपस्थित होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय ''संत तुकाराम यांच्या अभंगातील समाज आर्तता'' असा होता.

**कै. सौ. सरोजिनीदेवी तथा काकीजी यांची जयंती व प्रेसिडेन्ट डे :**

ताराराणी विद्यापीठाच्या प्रेरणा शक्ती व माजी उपाध्यक्षा, पुण्यशील माऊली कै.सौ.सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा पूज्य काकीजी यांची १०० वी जयंती बुधवार, दिनांक २८/०४/२०१० या दिवशी विविध शाखांमधून साजरी करण्यात आली.

तसेच यादिवशी 'प्रेसिडेंट-डे' साजरा करण्यात आला यावेळी संस्थेमधील सर्व सेवकांतर्फे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्यावतीने सर्व सेवकांना व हितचिंतकांना भोजन देण्यात आले.

**सरोज कॉम्प्युटर लॅबः**

ताराराणी विद्यापीठतर्फे उषाराजे हायस्कूलमध्ये इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थिनींना संगणकाची ओळख होणेसाठी, संगणक प्रशिक्षणासाठी अद्ययावत अशी संगणक प्रयोगशाळा 'सरोज कॉम्प्युटर लॅब' सुरु केलेली आहे. या सरोज कॉम्प्युटर लॅबमध्ये हायस्कूलमधील विविध इयत्तेमधील १०८९ विद्यार्थिनीं प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत. तसेच विद्यार्थिनींची संगणकाबाबतची दिवसेंदिवस आवड वाढत असल्याने त्यांना जास्तीत जास्त नवीन सोयी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळें शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थिनी संगणक शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

**विद्यापीठ अनुदान आयोगाचे आर्थिक सहाय्य :**

**महिला वसतिगृह अनुदान :**

विद्यापीठ अनुदान आयोगाने महिला वसतिगृहाच्या बांधकामासाठी रुपये ६५,९५,५१५/- अनुदान मंजूर केले असून त्या रक्कमेपैकी पहिला हप्ता रक्कम रुपये ३२,९५,५१५/- व दुसरा हप्ता रक्कम रुपये १६,४८,८७८/- महाविद्यालयास प्राप्त झालेले आहेत. तर तीसरा हप्ता येणे बाकी आहे. यामधून

वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या वसतिगृहाचा या शैक्षणिक वर्षामध्ये १०५ विद्यार्थिनींना लाभ झाला.

**यु. जी. सी. कडून कोर्सकरीता अनुदान :**

अ) यु. जी. सी. कडून XI Plan मध्ये Development व Grant Merged Sheme Grant म्हणून ३४,२०,०००/- रुपये चे अनुदान मंजूर झालेले आहे.

ब) यु. जी. सी. कडून सन २००९-२०१० पासून करिअर ओरिएंटेड प्रोग्राम अंतर्गत Beauty Culture & Therapy हा कोर्स सुरू करण्यासाठी ७,००,०००/- रु. चे अनुदान मिळाले आहे. सदरचा कोर्स सुरू झालेला आहे.

**डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन :**

ताराराणी विद्यापीठाच्या सर्व शाखातील विद्यार्थिनींना शालेय व सांस्कृतिक कार्यक्रम करणेकरीता संस्थेच्या आवारामध्ये सर्व सोयीनियुक्त अशा भव्य डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन सभागृहाच्या बांधकामास सुरुवात झालेली आहे. या सभागृहाच्या बांधकामास आज अखेर ५७ लाख इतका खर्च आलेला असून बांधकाम पूर्ण करण्यास अंदाजे आणखी ५० लाख इतका खर्च येणार आहे. या इमारतीचे जवळ जवळ ९५टक्के काम पूर्ण झालेले आहे.

**स्कॉलरशीप परीक्षेमध्ये मिळालेले उल्लेखनीय यश :**

संस्थेच्या प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेच्या विद्यार्थिनींनी स्कॉलरशीप परीक्षेमध्ये मिळविलेले यश - जिल्हा स्कॉलरशीप परीक्षा -

१. कु. निहारिका अमित साळुंखे - १० वा क्रमांक

२. कु. ऐश्वर्या गुलाबराव झांबरे - १२ वा क्रमांक

संस्थेच्या उषाराजे हायस्कूल शाखेच्या विद्यार्थिनींनी स्कॉलरशीप परीक्षेमध्ये मिळविलेले यश- माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा -

१. कु. सुखदा विजय घेवारी - २ रा क्रमांक

२. कु. वैष्णवी विलास शिंदे - १५ वा क्रमांक

उषाराजे हायस्कूलमधील कु. पुजारी गौरी नितीन या विद्यार्थिनींने एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेमध्ये मराठी विषयास १०० पैकी ९८ गुण मिळवून महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी विषयात प्रथम क्रमांक मिळविला.

**रणरागिणी स्पोर्टस क्लब उपक्रम :**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही खेळाडू विद्यार्थिनींना विविध खेळांचे प्रशिक्षक नेमून वैयक्तिक मार्गदर्शन केले जात आहे. याचा लाभ संस्थेच्या विविध शाखेतील खेळाडू विद्यार्थिनींना होत आहे. यामध्ये हॉकी,

व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, कब्बडी, खो-खो, हॅन्डबॉल, क्रिकेट इ. सांघिक खेळामध्ये व वैयक्तिक खेळात विद्यार्थिनींनी जिल्हा पातळीवर, विभागीय पातळीवर व राज्यस्तरावर यश संपादन केलेले आहे.

**सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना :**

प्रतिवर्षाप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षामध्ये शनिवार, दि. १५ ऑगस्ट २००९ या दिवशी रोटरॅक्ट क्लब या संस्थेने प्रिन्स शिवाजी विद्यालय या शाखेतील ६० गरीब व होतकरु विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य देऊन मदत केली.

**मा. रा. कृ. कणबरकर**
कार्यकारी अध्यक्ष
ताराराणी विद्यापीठ

**डॉ. क्रांतिकुमार पाटील**
सेक्रेटरी
ताराराणी विद्यापीठ

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# कमला महाविद्यालय, कोल्हापूर

## नॅक मानांकन 'बी' प्लस (पंचतारांकित)

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

ज्ञानयोगी शिक्षणमहर्षी कै. मा. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजींनी व त्यागमूर्ती कै. सौ. सरोजिनी देवी विश्वनाथ तथा काकीजी यांना विनम्र अभिवादन. 'निर्मांतु शिवं सुंदरम्' हे ब्रीद असलेल्या आमच्या महाविद्यालयाने स्वयंपूर्ण, तेजस्वी, पराक्रमी युवती घडल्या जाव्यात, त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये धैर्य, शौर्य, सृजनशीलता, कार्यनिष्ठता, ध्येयवाद, मानवतावाद या गुणांचा परिपोष व्हावा अशा अभ्यासक्रमावर भर दिला आहे. म्हणूनच आमच्या अनेक माजी विद्यार्थिनी समाजातील विविध क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी बजावताना दिसतात. म्युनिच (जर्मनी) मध्ये झालेल्या नेमबाजी स्पर्धेत कु. तेजस्विनी सावंतने विश्वविक्रमाशी बरोबरी साधून सुवर्णपदक प्राप्त केले. तिच्या या यशाची मूहर्तमेढ आमच्या या महाविद्यालयात रोविली गेली याचा आम्हाला अभिमान वाटतो. कु. प्रियदर्शनी मोरे ही उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरून प्रशासनात भरीव कार्य करताना दिसते. तर कु. दिपाली पाटील ही महाराष्ट्र शासनाच्या जलस्वराज्य प्रकल्पावर विभागीय अधिकारी म्हणून रूजू झालेली आहे. अशा यशस्वी विद्यार्थिनींच्या संख्या भविष्यात निश्चित वाढतील या दृष्टीने आमच्या महाविद्यालयाचे कुशल नेतृत्व दूरदृष्टी संपन्न व्यक्तिमत्व, ताराराणी विद्यापीठ संस्थेचे सचिव व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब हे सतत प्रयत्नशील आहेत.

**प्रमुख घटना-समारंभ-पाहुण्यांची भेट-व्याख्याने-उपक्रम**

**कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची पुण्यतिथी :-**

ताराराणी विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा, स्फूर्तीदेवता, पुण्यशील माऊली कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा पूज्य काकीजी यांच्या ४० व्या पुण्यतिथी निमित्त प्रसिद्ध वक्त्या व न्यू लॉ कॉलेजच्या प्राचार्या अॅड. मंगला बडदारे यांचे 'स्त्री विषयक कायदे सामाजिक मानसिकता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले व त्यांच्या हस्ते उषाराजे हायस्कूल मधील गरीब, होतकरू विद्यार्थिनींना गणवेश वाटप करण्यात आले.

**कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा प.पू. काकाजी यांची १०९ वी जयंती :-**

करवीर नगरीचे भूषण, स्त्री शिक्षणाचे महान पुरस्कर्ते ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा प. पू. काकाजींच्या १०९ व्या जयंती निमित्त मा. प्राचार्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी आयोजित रक्तदान शिबीरामध्ये एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागातील विद्यार्थिनींनी रक्तदान केले. तसेच या प्रसंगी काव्यवाचन व निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

**थोर विभूतींचे पुण्यस्मरण :-**

करवीरभूषण श्रीमंत छत्रपती शाहू महाराज; महाराणी ताराराणी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले सारख्या थोर सामाजिक विभूतींच्या जयंती, पुण्यतिथी निमित्त मा. प्राचार्य, डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

**स्वांतत्र्यदिन :-**

दि. १५ ऑगस्ट २००९ या दिवशी स्वांतत्र्य दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रामराव बेनाडीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

**घटस्थापना :-**

दि. १९ सप्टेंबर २००९ रोजी भवानी महोत्सवानिमित्त प्रसिध्द उद्योगपती मा. व्ही. एन. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शुभदा देशपांडे यांच्या शुभहस्ते घटस्थापना सोहळा संपन्न झाला.

**मातृदिन :-**

भवानी महोत्सवात हळदी-कुंकू समारंभ संपन्न झाला. महाविद्यालयाच्यावतीने प्रा. सौ. टी. बी. मुडेकर यांनी काम पाहिले.

**कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा प. पू. काकाजी यांचा स्मृतिदिन :-**

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या १५ व्या स्मृतिदिना निमित्त प्रसिध्द वक्ते व थोर शिक्षणतज्ज्ञ मा. प्राचार्य पी. बी. पाटील यांचे 'शिक्षण क्षेत्रातील बदलती मूल्ये' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्यांच्या हस्ते ताराराणी विद्यापीठाचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' श्रीमती जयश्री दानवे (उषाराजे हायस्कूल) यांना प्रदान करण्यात आला.

**प्रजासत्ताक दिन :-**

दि.२६ जानेवारी २०१० या दिवशी प्रजासत्ताक दिनानिमित्त मा. रा. कृ. कणबरकर, कार्यकारी अध्यक्ष ताराराणी विद्यापीठ यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

**तुकाराम बीज :-**

दि. ७ मार्च २०१० या दिवशी 'तुकाराम बीज' निमित्त प्रसिध्द वक्ते व विचारवंत मा. श्री. धनराज वंजारी यांचे ''संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील'' 'समाज आर्तता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**महाविद्यालयाच्यावतीने राबविलेले उल्लेखनीय कार्यक्रम व उपक्रम :-**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अग्रणी महाविद्यालय विवेकानंद कॉलेज क्लस्टर योजनेअंतर्गत राबविलेले उपक्रम -

१) दि. २३ डिसेंबर २००९ रोजी हिंदी साहित्य मंडळाच्यावतीने 'जाहिरात लेखन' या विषयावरील एक

दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

२) दि. २४ डिसेंबर २००९ रोजी मराठी वादविवाद मंडळाच्या वतीने 'कादंबरी व ललित निबंध लेखन कौशल्ये' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

३) दि. ४ जानेवारी २०१० रोजी 'उद्योजकतेतून महिला सबलीकरण' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

४) Faculty Development च्या संयुक्त विद्यमाने दि. ५, ६ व ७ जानेवारी २०१० रोजी बी.सी.ए. भाग ३ च्या विद्यार्थिनींसाठी 'बुध्दिमत्ता रूपांतरण' या विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

५) दि. २५ जानेवारी २०१० रोजी राष्ट्रीय छात्रसेना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

६) दि. ५ ऑक्टोबर २००९ रोजी निसर्ग मित्र, कोल्हापूरचे सेक्रेटरी श्री. अनिल चौगुले यांचे 'पर्यावरण संवर्धनात विद्यार्थिनींचा सहभाग' या विषयावरील व्याख्यान व जैवविविधता या विषयावरील स्लाईड शोचे आयोजन करण्यात आले होते.

७) Service to Neighbouring Community अंतर्गत राजारामपूरी, टाकाळा परिसर येथील राजेश्वरी महिला बचत गट आणि परिसरातील इतर महिलांसाठी 'इंधन बचत घरगुती गैस' या विषयावर डॉ. अनुराधा सामंत यांचे व्याख्यान आयोजित केले गेले.

८) दि. १ फेब्रुवारी २०१० रोजी कदमवाडी, विचारेमाळ परिसरातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील महिलांसाठी 'आरोग्य शिबीर' आयोजित करण्यात आले.

**महाविद्यालयीन शैक्षणिक प्रगतीचा संख्यात्मक व गुणात्मक विकास :-**

सन २००९-२०१० या शैक्षणिक अहवालसाठी आमच्या महाविद्यालयात कनिष्ठ विभागात कला, वाणिज्य, विज्ञान या तीन विद्याशाखांतर्गत १०७६ विद्यार्थिनी व वरिष्ठ विभागात कला-वाणिज्य, बी.सी.ए. भाग १-२-३ या शाखांतर्गत १०६१ विद्यार्थिनी असून एकूण २१३७ विद्यार्थिनी ज्ञानार्जनाचे कार्य करीत आहेत.

**कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थिनी संख्या :-**

| | |
|---|---|
| ११ वी कला १७८ | १२ वी कला १८५ |
| ११ वी वाणिज्य २३७ | १२ वी वाणिज्य १४० |
| ११ वी विज्ञान २०५ | १२ वी विज्ञान १३७ |

**वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थिनी संख्या :-**

| | |
|---|---|
| बी.ए. भाग-१ - २४० | बी. कॉम. भाग-१ - १२३ |
| बी.ए. भाग-२ - १६९ | बी.कॉम. भाग-२ - ९७ |
| बी.ए. भाग-३ - १०२ | बी. कॉम. भाग-३ - ८८ |

| | |
|---|---|
| बी.सी.ए. भाग - १ - ५४ | एम.ए. भाग-१ - १९ |
| बी.सी.ए. भाग - २ - ७१ | एम.ए. भाग-२ - १७ |
| बी.सी.ए. भाग - ३ - ६१ | पी. जी. डिप्लोमा योगा थेरेपी - २० |

- पदवी स्तरावर कला शाखेसाठी १. समाजशास्त्र २. अर्थशास्त्र ३. होमसायन्स ४. इंग्रजी ५. हिंदी या विषयांचे स्पेशल विषय म्हणून अध्यापन केले जाते.
- वाणिज्य शाखेसाजी १. Advanced Accounting. २. Industrial Management हे विषय विशेष स्तरावर B.Com. भाग III साठी शिकविले जातो.
- बी. सी. ए. चा पदवीस्तरावर अभ्यासक्रम शिकविला जातो.
- पदव्युत्तर स्तरावर एम. ए. होमसायन्स अभ्यासक्रम शिकविला जातो. असे अध्यापन करणारे आमचे महाविद्यालय दक्षिण -पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय आहे. सन २००८ मध्ये एम. ए. भाग-१ होमसायन्स सुरू करण्यात आले व सन २००९ वर्षी नैसर्गिक विस्ताराने एम. ए. भाग २ सुरू करण्यात आलेले आहे.
- Innovative Programme अंतर्गत Yoga Theraphy हा P. G. Diploma U.G.C. च्या मान्यतेने सुरू करण्यात आलेला आहे.
- व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये U.G.C. च्या मान्यतेनुसार करिअर ओरिएंटेड कोर्स अंतर्गत Basic Computer and Information Technology हे कोर्स सुरू आहेत.
- २००९-१० यावर्षी Beauty Culture and Therapy हा कोर्स सुरू करण्यात आलेला आहे. सदर कोर्ससाठी U.G.C. चे सात लाख रूपयांचे अनुदान प्राप्त झालेले आहे.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत पदवी स्तरावर कला व वाणिज्य शाखेचे वर्ग चालविले जातात.
- कनिष्ठ महाविद्यालयात हिंदी, मराठी, गणित, इलेक्ट्रॉनिक्स इन्फर्मेशन ॲड टेक्नॉलॉजी या विषयांच्या अध्यापनाची सोय उपलब्ध आहे.
- कनिष्ठ व वरिष्ठ वाणिज्य विभागामध्ये सर्वविषय इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची सोय उपलब्ध आहे.
- महाविद्यालयाची मुख्य इमारत तीन मजली असून श्रीमती शकुंतला घाडगे अभ्यासिका ग्रंथालय, वसतिगृह, उपहारगृह व नवीन इमारतींचे विस्तारीकरण सुरू आहे.
- कमला हेल्थ क्लबची स्वतंत्र इमारत.
- विविध खेळांची मैदाने.

**विविध स्तरावरील गुणात्मक विकास :-**

**उज्ज्वल निकाल परंपरा सन २००९-१० या शैक्षणिक वर्षातील वर्गवार निकाल :**

१२ वी कला - ९१% १२ वी वाणिज्य - ८७.५९% १२ वी विज्ञान - ९१%

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बी.ए. भाग -१ | ९१% | बी.ए. भाग-२ | ९९% | बी.ए. भाग-३ | ९४% |
| बी.कॉम भाग-१ | ७६% | बी.कॉम भाग- २ | ८९% | बी.कॉम भाग- ३ | ८८% |
| बी.सी.ए. भाग- १ | ७८% | बी.सी.ए. भाग- २ | १००% | | |

◆ **प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनींचे सुयश :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कला विभाग : | १) इंग्रजी स्पेशल | ०५ | २) समाजशास्त्र | ०३ |
| | ३) हिंदी स्पेशल | ०३ | ४) अर्थशास्त्र | ०४ |
| | ५) होमसायन्स | ०३ | ६) वाणिज्य विभाग | ०६ |

◆ **उल्लेखनिय यश प्राप्ती :-**

कु. जाधव ज्योती एस. ही विद्यार्थिनी अपंग विद्यार्थिनीमध्ये सन २००९ या शैक्षणिक वर्षामध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये 'समाजशास्त्र' विषयात सर्व प्रथम आली. तसेच 'नैशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड युनिट महाराष्ट्र' गुणवंत विद्यार्थी सन २००९ चा पुरस्कार तिला प्राप्त झाला.

◆ **विशेष शिष्यवृत्तीच्या मानकरी यशस्वी विद्यार्थिनी :-**

१) राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट तृप्ती बसुगडेस रु. ३०,०००/- 'सहारा' स्कॉलरशीप महाराष्ट्र एन.सी.सी. प्राप्त झाली आहे.

२) सी.पी.एल. माधवी काकरे या छात्रसेनेस चीफ मिनिस्टर रु. २०००/- स्कॉलरशीप एन.सी.सी. महाराष्ट्र प्राप्त झाली आहे.

३) कै. सौ. सुरेखा बागल शिष्यवृत्ती रू. २५,०००/- कु. चौगुले रोहिणी भानुदास - बी. ए. भाग-१, कु. ठाकुर दुर्गा रामबहादूर - बी. कॉम. भाग - १

४) कमला ची आदर्श विद्यार्थिनी - कु. पाटील स्नेहलता विष्णू या बी.सी.ए. भाग - ३ च्या विद्यार्थिनीस सन २००९-१० या शैक्षणिक वर्षाचा आदर्श विद्यार्थिनींचा पुरस्कार रोख रू. १०००/- प्राप्त झालेला आहे. व Sword of Honour ही प्राप्त झालेला आहे.

◆ **कमला २००९ वार्षिकाचे सुयश :-**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी कमला वार्षिकाने पारितोषिके मिळविण्याची परंपरा कायम ठेवली सन २००९-१० या वर्षी शिवाजी विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत खालील विद्यार्थिनींच्या लेखास बक्षिसे प्राप्त झालेली आहेत.

**मराठी साहित्य विभाग :** कु. सरदेसाई शीतल प्रकाश हिच्या "ज्ञानसाधक सत्यव्रती दुर्गा भागवत" या व्यक्तिचित्रणास तृतीय क्रमांक मिळाला.

**हिंदी साहित्य विभाग :** कु. जमादार जस्मिन हिम्मत हिच्या "सुहाना सफर कोकण घाटीका" या हिंदी वर्णनास द्वितीय क्रमांक मिळाला.

**विशेष यशप्राप्ती**

मराठी वाङमय विवाद मंडळाच्यावतीने बाहेरील स्पर्धेत पाठविलेल्या गुणी विद्यार्थिनींचे कौतुकास्पद यश.

१) कु. अंकिता शहा अविनाश सदर विद्यार्थिनी माणिक मोती - मासिक आयोजित राज्यस्तरीय मराठी काव्यवाचन स्पर्धेतील यशाची मानकरी ठरली.

२) कु. सरदेसाई शीतल प्र. आंतर महाविद्यालयीन काव्यलेखन व वाचन स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांकची मानकरी ठरली.

३) कु. डूम मधुरा कुमार - कै. विजय देसाई स्मृती वक्तृत्व स्पर्धेतील मानकरी ठरली.

**यु. जी. सी. अनुदान प्राप्त** : College Development Grant

अ) $XI^{th}$ Plan खाली १३,००,०००/- लाखाचे अनुदान महाविद्यालयास प्राप्त झाले आहे.

ब) Merged Schemes Under Rs. २१,२०,०००/- रु. अनुदान मंजूर झाले आहे.

क) व्यावसायिक अभ्यासक्रम Beauty Culture and Therpy कोर्ससाठी सात लाखाचे अनुदान प्राप्त झाले आहे.

**क्रीडा क्षेत्रातील यश : सांधिक व वैयक्तिक :-**

◆ **राष्ट्रीय स्तरावर सहभाग :-**

राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत कु. स्नेहल नाईक व ऑल इंडिया इंटरयुनिव्हर्सिटी व्हॉलीबॉल स्पर्धेत कु. गंगा बोंद्रे या क्रीडापटुची अभिनंदनीय निवड झाली आहे.

◆ **राज्यस्तरीय स्पर्धेतील यश :-**

१) शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्वीमिंग स्पर्धेत कु. आश्विनी मगदूम ला ५० मी., १०० मी., २०० मी. ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला.

◆ **राष्ट्रीय सेवा योजना :-**

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत समाजसेवेचे कार्य आमच्या विद्यार्थिनी करतात. या योजनेत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी व ५ प्राध्यापक सहभागी झाले. अहवालससाली दत्तक खेडे मौजे कणेरी, ता. करवीर येथे विद्यार्थिनींनी श्रमदानाचे विविध उपक्रम व अन्य प्रबोधनात्मक उपक्रम, एडस् रॅली, स्वच्छता मोहिम, अंधश्रध्दानिर्मूलनात्मक कार्यक्रम पार पाडले. तसेच समाजप्रबोधनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

◆ **राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) :-**

कमला महाविद्यालयाच्या छात्रसैनिकांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या यशाचा आढावा.

अ) शैक्षणिक प्रगती :-

छात्र सेनेच्या 'बी' आणि 'सी' प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १००% लागला.

ब) राष्ट्रीयस्तरावरील विविध कॅम्पमधील सहभाग -

- दि. ११ मे २००९ रोजी राष्ट्रीय स्तरावर National Integretion Camp पाचगणी, महाबळेश्वर येथे Sgt. आरती कुलकर्णी, Sgt. नूतन रावळ, L/CPL वर्षा माने, Cdt. कोमल भातमोरे, Cdt. शिल्पा भोसले, Cdt. मनाली माने या कॅडेटस् सहभागी झाल्या होत्या.
- ऑल इंडिया फायरिंग कॅपिटिशनमध्ये Sgt. आरती कुलकर्णी हिला फायरींग मध्ये ब्रॉन्झ मेडल मिळाले.
- N.C.C. स्कॉलरशीप २००८-०९ साठी कु. तृप्ती अरूण बसुगडे या कॅडेटला सहारा स्कॉलरशीप रु. ३०,०००/- ॲवार्ड झाली.
- CPL माधवी राजेंद्र काकरे या विद्यार्थिनीस N.C.C. महाराष्ट्र डायरेक्टर चीफ मिनिस्टर स्कॉलरशीप रु. २,०००/- ॲवार्ड आली.
- २ जून रोजी ANO वर्षा साठे यांना D.G.N.C.C. यांच्याकडून Captain Rank ॲवार्ड झाली.

**फोरम ऑफ फ्री एंटरप्रायजेस वक्तृत्व स्पर्धा :-**

विद्यार्थिनींच्या सामाजिक जाणीव प्रगल्भ होण्यासाठी, देशा पुढील ज्वलंत प्रश्नावर फोरम ऑफ फ्री एंटरप्राईजेस मुंबई यांच्यावतीने महाविद्यालयात दरवर्षी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी दि. १० नोव्हेंबर २००९ रोजी सदर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व प्रथम तीन क्रमांकास अनुक्रमे रु. ३,०००/- रु. २,०००/- रु. १,०००/- तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके दिली गेली.

**प्रौढशिक्षण व निरंतर समिती :-**

या विभागामार्फत अहवालसाली 'अेरोबिक्स', 'ज्युदो-कराटे', 'योगासने' व 'ड्रेस डिझाइन' हे कोर्सेस घेण्यात आले.

**विद्यार्थिनी कल्याण निधी :-**

अहवालसाली कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील होतकरू, गरीब अशा एकूण १२० विद्यार्थिनींना १९,४००/- रू. आर्थिक सहाय्य देण्यात आले.

**ग्रंथालय अहवाल :-**

ग्रंथालयाची आज अखेर ग्रंथसंख्या ४२,५४३ असून या ग्रंथसंग्रहाची एकूण किंमत रुपये २६,३६,७५२/- इतकी आहे. सिनिअर व ज्युनिअर कॉलेजच्या ५६६ विद्यार्थिनींना पुस्तक संच बुक बँक योजनेतून देण्यात आले.

**अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष :-**

महाविद्यालयाची गुणवत्ता वृध्दींगत व्हावी व ती अधिक बळकट व्हावी यासाठी महाविद्यालयामध्ये IQAC (Internal Quality Assurance Cell) कार्यरत असून हा Cell महाविद्यालयासाठी Action Plan तयार करतो.

**वार्षिक दिन व वार्षिक पारितोषक वितरण समारंभ :-**

अहवालसाली वार्षिक दिनाचा शुभारंभ ६ फेब्रुवारी २०१० रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाने संपन्न झाला. तर दि. ७ फेब्रुवारी २०१० रोजी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वार्षिक दिनानिमित्त वक्तृत्व, रांगोळी, निबंधलेखन, मेहंदी, कुकरी इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. १५ फेब्रुवारी २०१० रोजी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. श्री. रा. कृ. कणबरकर यांच्या शुभहस्ते वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

**महाविद्यालयात कार्यरत विविध मंडळे :-**

विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाबरोबर त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडावा या उद्देशाने महाविद्यालयात विविध मंडळे कार्यरत असून ती विविध उपक्रम राबवित असतात. एकूण ४५ मंडळे स्पर्धा परीक्षा मागदर्शन व व्यक्तिमत्व विकास विभाग, परीक्षा विभाग, बॅचलर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन, फॅकल्टी डेव्हलपमेंट, विद्यार्थिनी प्रतिनिधी मंडळ, गृहशास्त्र विभाग, मूल्यशिक्षण हिंदी साहित्य मंडळ, मराठी वाङमय वादविवाद मंडळ, इंग्लिश फोरम, विविध कलागुण विकास मंडळ, निसर्ग मंडळ, आर्ट सर्कल, गुंजारव भित्ती पत्रक, सामाजिक शास्त्र मंडळ, कॉमर्स फोरम, साक्षरता अभियान, प्राध्यापक प्रबोधिनी अंधश्रध्दा निर्मूलन, लैंगिक छळ प्रतिबंधक, वसतिगृह व रॅगिंग प्रतिबंधक, मानसशास्त्रीय सल्ला व मार्गदर्शन केंद्र, शिक्षक-पालक संघ, माजी विद्यार्थिनी संघ सहल विभाग इत्यादी मंडळामार्फत विविध उपक्रम राबविले जातात व विद्यार्थिनींच्या विकासाला चालना दिली जाते.

**Memorandum of Understanding (M.O.U.) सामंजस्य करार :-**

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयामार्फत 'शैक्षणिक देवाण-घेवाण व परस्पर सहकार्य' या हेतूने पुढील संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत.

१) कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (के.आय.टी.) कोल्हापूर.

२) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.टी.) कोल्हापूर.

३) कैवल्यधाम आरोग्य मंदिर लोणावळा.

४) हनुमान व्यायाम प्रसार मंडळ, अमरावती.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पद्वी अभ्यास केंद्र :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, कार्यक्षेत्रातील एकमेव असे महिला व मुलींसाठीचे पदवी अभ्यासकेंद्र आमच्या इथे कार्यरत आहे. यावर्षी बी.ए., बी.कॉम. ची पदवी घेऊन अभ्यासकेंद्रातील तिसरी तुकडी बाहेर पडली असून बी.ए. व बी. कॉम पदवी चे तीनही वर्ग सुरू आहेत.

**डॉ. क्रांतिकुमार पाटील**

प्राचार्य,

कमला महाविद्यालय, कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन
# राजारामपुरी, कोल्हापूर.

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

महाराष्ट्र स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते महात्मा जोतिबा फुले व स्त्री शिक्षिका सावित्रिबाई फुले यांच्यानंतर कोल्हापूरमध्ये स्त्री शिक्षणाची गरज लक्षात घेऊन सन १९५१ मध्ये ताराराणी विद्यापीठाचे, संस्थापक व अध्यक्ष पूजनीय शिक्षण महर्षी कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा 'काकाजी' यांनी 'ताराराणी अध्यापिका विद्यालय' या नावाने शाखा सुरू केली. पूर्वी येथे शिक्षकांसाठी शिक्षणखात्याचा पी.टी.सी. हा कोर्स सुरु करण्यात आला होता. त्यानंतर जून १९६८ पासून एस.एस.सी. पास मुलींसाठी ''डिप्लोमा इन एज्युकेश'' हा कोर्स सुरू करण्यात आला. सन १९९३ पासून एच.एस.सी. पास विद्यार्थीनींसाठी 'डी. एड्. कोर्स' सुरू झाला. यामध्ये विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार जिल्हा व राज्यस्तरावर प्रवेश दिला जाऊ लागला. त्यानंतर शिक्षण प्रक्रियेत दर्जेदार शिक्षक घडविण्यासाठी सन २००४ पासून अभ्यासक्रमामध्ये आंतरवासिता उपक्रमाचा समावेश केला गेला. या अभ्यासक्रमांतर्गत यावर्षी या कोर्सला डी. टी. एड्. असे संबोधण्यात आले.

**शाखेचा विस्तार व विद्यार्थी संख्या :**

चालू वर्षाचे कामकाज १६ जून २००९ पासून सुरू झाले. यामध्ये प्रथम वर्षात ४० व द्वितीय वर्षात ४० विद्यार्थिनी शिकत होत्या. तसेच सेवांतर्गत प्रशिक्षण वर्गाच्या दोन तुकड्यांचे कामकाज दोन्ही सत्रामध्ये विभागले गेले. यामध्ये सर्व शिक्षण मोहिमेतंर्गत प्रशिक्षित व अप्रशिक्षित वर्गाची २ सत्रे व पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष वर्गाचे तीन सत्रामध्ये कामकाज झाले. सेवापूर्व व सेवांतर्ग प्रशिक्षणार्थींना अध्यापनासाठी ७ विनित पदव्युत्तर व १ पदवीधर प्रशिक्षित शिक्षक व १ कार्यानुभव शिक्षिका असे एकूण ९ अध्यापक कार्यरत होते.

**भौतिक सुविधा इमारत :**

आमच्या अध्यापक विद्यालयाचे प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य ताराराणी विद्यापीठाच्या पूर्वेकडील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील आठ खोल्यामध्ये आणि कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील महिलावसतीगृहाच्या पहिल्या मजल्यावरील चार खोल्यामध्ये चालते. इमारतीच्या समोर भव्य क्रीडांगण असून सर्व प्रकारच्या खेळांची सुविधा आहे. विद्यार्थीनी व स्टाफसाठी सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध अूसन सर्वांसाठी स्वच्छतागृहाची सोय केलेली आहे. तसेच प्रशिक्षणार्थींच्या सराव पाठासाठी उषाराजे हायस्कूल, प्रिन्स शिवाजी विद्यालय, टाकाळा विद्यामंदिर, कुमार व कन्या विद्यालय मंदिर गडमुडशिंगी या शाळांचे सहकार्य घेतले गेले.

**शाळेतील सांस्कृतिक उपक्रम :**

जून २००९ पासून मे २००९ अखेर वर्षातील सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये राजर्षी छत्रपती शाहू जयंती,

गुरुपौर्णिमा, लोकसंख्यादिन, कै. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची पुण्यतिथी, कै. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णाभाऊ साठे जयंती, ९ ऑगस्ट क्रांतीदिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, शिक्षक दिन, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन, हिंदी दिन, महात्मा गांधी जयंती, प्रथम वर्ष स्वागत समारंभ व महात्मा फुले पुण्यतिथी, नेहरू जयंती, डॉ. आंबेडकर जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, कै. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची पुण्यतिथी, नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती, छ. शिवाजी महाराज जयंती, महिला दिन, तुकाराम बीज, कै. सरोजिनीदेवी व्ही. पाटील तथा काकीजी यांची जयंती, १ मे महाराष्ट्र दिन व वार्षिक स्नेहसंमेलन असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**शैक्षणिक उपक्रम :**

**१) शैक्षणिक सहल :**

दि. १२-०१-२०१० ते १५-०१-२०१० या कालावधीत गोवा या ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते.

**२) समाजसेवा शिबिर :**

दि. ०२-०३-२०१० ते १५-०३-२०१० या कालावधीत समाजसेवा शिबिराचे आयोजन केले होते. हे शिबिर श्री क्षेत्र आदमापूर येथे ३ दिवस निवासी स्वरूपाचे होते. या शिबिरात विविध उपक्रमांचे व श्रमदानाचे आयोजन केले होते.

**३) छात्रअध्यापक सेवाकाल :**

दि. ०२-०३-२०१० ते १७-०३-२०१० अखेर कुमार व कन्या वि. मं. गडमुडशिंगी या दोन शाळेत छात्रअध्यापक सेवाकालाचे आयोजन केले होते.

**४) स्पर्धेतील यश :**

आमच्या अध्यापक विद्यालयांतर्गत बौध्दिक स्पर्धा, एकपात्री अभिनय, निबंधलेखन, भावगीत, समूहगीत गायन, वक्तृत्व, खो-खो या सांघिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. जिल्हास्तरीय वैयक्तिक क्रीडा स्पर्धेमध्ये कु. सुप्रिया पाटील प्रथम वर्ष डी.टी.एड्. हिचा गोळा फेक या स्पर्धेत द्वितीय क्रमांक व सांस्कृतिक स्पर्धेत एकपात्री अभिनयामध्ये सुप्रिया पाटील हिचा तृतीय क्रमांक आला.

**५) एन्. सी. सी. :**

महाराष्ट्रात फक्त आमच्याच अध्यापक विद्यालयामध्ये एन्. सी. सी. सिनिअर विंगची संधी कै. काकाजींनी उपलब्ध करून दिली आहे. या विभागामध्ये ३० छात्रसैनिक सहभागी असून प्रथम वर्षात १० व द्वितीय वर्षात २० छात्रसैनिकांचा समावेश आहे. यामध्ये,

१) दि. २१-१२-२००९ ते ३०-१२-२००९ मध्ये एस.आर.पी. मैदान, कसबा बावडा, कोल्हापूर या ठिकाण चा ATC-II कॅम्प होता. यामध्ये आमच्या कॅडेटस्नी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

२) दि. १-०२-२०१० ते १०-०२-२०१० मध्ये एस.आर.पी. मैदान, कसबा बावडा, कोल्हापूर या

ठिकाण ATC-II कॅम्प होता. यामध्ये सुध्दा आमच्या कॅडेटस्नी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

३) एन्. सी. सी. 'बी' सर्टिफिकेट परीक्षेमध्ये २० छात्रसैनिकांनी परीक्षा देऊन यशस्विता प्राप्त केली. 'सी' सर्टिफिकेट मध्ये १० छात्र सैनिकांनी यश प्राप्त केले. या परीक्षेचा निकाल १००% होता.

**परीक्षा निकाल :**

आमच्या अध्यापक विद्यालयाचा प्रथम वर्ष डी.टी.एड्. निकाल ९४.८७% व द्वितीय वर्ष डी.टी.एड्. चा ९२.५०% इतका निकाल लागला. द्वितीय वर्षातील १६ विद्यार्थिनींनी ८०% हून अधिक गुण प्राप्त केले आहेत व २४ विद्यार्थिनींनी ७०% हून अधिक गुण प्राप्त केले आहेत. गेली ३ वर्षे ७०% गुण सर्वच विद्यार्थिनींनी प्राप्त केलेले आहेत.

**विविध व्याख्यात्यांची व्याख्याने :**

प्राचार्य कुंभार एन. एस., डॉ. मिलिंद मानकर, दीपक देवलापूरकर, रणजित चिले, प्रा. साधना झाडबुके, डॉ. जे. बी. शिंदे, इत्यादी मान्यवर वक्त्यांची व्याख्याने विविध विषयांवर व्याख्याने संपन्न झाली.

अशा प्रकारे कै. ति. काकाजी आणि ति. काकीजी यांचे आशिर्वादाने आणि मा. अध्यक्ष श्री. रामराव बेनाडीकर साहेब, कार्यकारी अध्यक्ष, मा. श्री. कणबरकर साहेब, मा. सेक्रेटरी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे आमचे डी. एड्. कॉलेज प्रगती पथावर वाटचाल करीत आहे.

**श्रीमती एम. आर. मांडरे**
प्राचार्या,
ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यूकेशन,
राजारामपुरी, कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर.

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

हिंदवी स्वराज्याच्या पडत्या काळात स्वराज्याची कोलमडून पडलेली दौलत सावरण्यासाठी महाराष्ट्राच्या निराश मनाला धीर देण्यासाठी निष्प्राण देशात प्राण ओतण्यासाठी, महाराष्ट्रात एक असामान्य स्त्री पुढे आली, ती स्त्री होती शिवस्नुषा 'महाराणी ताराराणी'.

अशा असामान्य कर्तृत्ववान स्त्रीचे आधुनिक महाराष्ट्राला सतत स्मरण व्हावे म्हणून आणि स्त्री हीच समाजाची प्रेरक व तारक शक्ती असते हे जाणून केवळ स्त्री शिक्षणासाठी वाहून घेतलेल्या द्रष्टया काकाजींनी १९४५ साली केवळ २२ मुलींनिशी 'ताराराणी विद्यामंदिर' सुरु करुन ताराराणी विद्यापीठाची मुहुर्त मेढ रोवली. ही संस्था आज एक महान वटवृक्ष होवून उभी आहे.

या भव्य वटवृक्षरुपी विद्यापीठाच्या अनेक शाखांपैकी एक शाखा म्हणजे बहुउद्देशीय 'उषाराजे हायस्कूल'.

कोल्हापूरातील नामांकित शाळांपैकी एक शाळा असलेल्या उषाराजे हायस्कूलमध्ये आज इयत्ता ५वी ते १०वी अखेर ३६ तुकड्या असून एकूण सुमारे २५४८ विद्यार्थिनी येथे शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थिनींचे अध्ययन कार्य सुव्यवस्थितपणे चालविणेसाठी शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी असा एकूण ७३ स्टाफ नेमणेत आला आहे.

अशा या वैशिष्टयेपूर्ण असणाऱ्या उषाराजे हायस्कूलमध्ये गृहशास्त्र, संगणक, गायन, वादन, चित्रकला, शिवणकाम, भरतकाम, विणकाम, संगीत, कार्यानुभव, खेळ, एन.सी.सी., एम.सी.सी., आर.एस.पी., गर्लगाईड, बागकाम, मूल्यशिक्षण, पर्यावरण, जनरल नॉलेज इ. विविध विषयांचे शिक्षण दिले जाते.

**एस. एस. सी. निकाल :-**

उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींची केवळ संख्यात्मक वाढ अधिक नसून त्यांच्या गुणात्मक वाढीकडे ही अधिक लक्ष दिले जाते.

मार्च २०१० मध्ये एस.एस.सी. परीक्षेसाठी एकूण ४३६ विद्यार्थिनी बसल्या होत्या त्यापैकी ३८४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या.

शाळेचा निकाल ८८.०७% लागला. शाळेमध्ये ९०% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या एकूण ५१ विद्यार्थिनी आहेत.

यंदाच्या निकालाचे वैशिष्टय म्हणजे मराठी विषयात राज्यात प्रथम कु. पुजारी गौरी नितीन आली. तिला १०० पैकी ९८ गुण मिळाले व तिला खालीलप्रमाणे पारितोषिके मिळाली.

नाटयाचार्य कृष्णाजी खाडीलकर पारितोषिक गिरगाव, मुंबई रू. १००००/-

मातोश्री शामाबाई कोरगावकर पारितोषिक, विलेपार्ले(पूर्व), मुंबई रू. ५००/-

शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे पारितोषिक रू. १०००/-

कै. सौ. कृष्णाबाई सिताराम शिंदे(मातोश्री) पारितोषिक, कराड, सातारा रू. १०००/-

४) कु. कुंभार स्नेहल गोविंद शाळेत प्रथम ५५० पैकी ५४६ गुण ९९.२७ % व्दितीय क्रमांक कु. पुजारी गौरी नितीन ५५० पैकी ५४३ गुण ९८.७३ %, तृतिय क्रमांक कु. पाटील सुस्मिता सुरेश ५५० पैकी ५३३ गुण ९६.९१%

याचप्रमाणे विषयात पैकीच्या पैकी गुण मिळविलेल्या विद्यार्थिनी खालीलप्रमाणे

कु. कुंभार स्नेहल गोविंद - गणित, समाजशास्त्र व संस्कृत तसेच इंग्रजी विषयात ९८ गुण प्राप्त.

कु. कारंडे प्रिति राजेंद्र - गणित कु. पाटील श्रध्दा सुनिल - गणित

कु. जाधव प्राजक्ता केशवराव - गणित व संस्कृत

कु. पुजारी गौरी नितिन - शास्त्र, गणित व संस्कृत कु. पुराणिक पल्लवी किरण - संस्कृत

तसेच मागासवर्गीयात शाळेत कु. दळवी निकिता नंदकिशोर गुण ५२४/५५० (९५.२७%) व अपंग विद्यार्थिनींच्यात प्रथम कु. माने तृप्ती तुकाराम ४४३/५५० (८०.५५%)

अशा प्रकारे विद्यार्थिनींनी भरघोस सुयश मिळविले.

**माध्यमिक शिष्यवृत्ती निकाल :-**

सन २००९-२०१० मध्ये झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस एकूण २५ विद्यार्थिनी बसल्या होत्या. निकाल १०० % लागला.

या परीक्षेत शाळेत प्रथम व जिल्हयात २री - कु. घेवारी सुखदा विजय ७वी ड

कु. शिंदे वैष्णवी विलास ही जिल्हयात १५वी, कु. बनकर शरयु शाहू शहरात २६वी, पाटील राजश्री ज्ञानदेव शहरात ९७वी, कु. चौगुले सुप्रिया रंगराव ११०वी, कु. हर्डिकर वैष्णवी सुश्रुत १२७वी.

अशाप्रकारे वरील विद्यार्थिनींने सुयश मिळविले.

**यावर्षीचे उपक्रम :-**

शैक्षणिक वर्ष १२ जून २००९पासून सुरु झाले. उषाराजे हायस्कूल ही एक बहुउद्देशीय शाळा असल्याने विद्यार्थिनींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संपूर्ण वर्षभरातच अनेक विविध उपक्रम हाती घेतले जातात. जूनमध्ये अतिशय उत्साहात शाळेचे नववर्ष सुरु झाले. इ. ५वी ते ८वी मध्ये नवीन मुलींचे प्रवेश सुरु झाले. जुन २००९मध्ये इ. ८वी, ५वी, १०वी च्या नवीन मुलींच्या पालकांसाठी शालेय शिस्त, नियोजन, उपक्रम यांची माहिती देण्यासाठी मेळावा संपन्न झाला. पालकांनी सतत शाळेच्या संपर्कात रहावे असे अवाहन केले. थोरामोठ्यांची जयंती-पुण्यतिथी साजरी करुन त्यांच्या कार्याचा आदर्श मुलींपुढे ठेवला जातो. दि. २३/६/२००९ रोजी महाकवी कालीदास यांची जयंती साजरी करणेत आली. दि. २६/६/२००९ रोजी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी केली.

दि. ४/७/०९रोजी स्वामी विवेकानंद व वैज्ञानिक मेरी क्युरी यांची पुणयतिथा संपन्न झाली. दि. ७/७/

२००९ रोजी गुरूपौर्णिमा व दि. ११/७/०९रोजी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्य भारताच्या वाढत्या लोकसंख्येचा आढावा कार्याक्रमाव्दारे घेण्यात आला.

दि. १८/७/०९रोजी ताराराणी विद्यापीठाच्या उपाध्यक्षा कै. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची ४०वीपुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमानिमित्त मा. श्री.कणबरकरसो यांच्या हस्ते गरजू विद्यार्थिनींना गणवेश वाटप करण्यात आले.

दि. २२/७/२००९ रोजी छ. राजाराम महाराज यांची जयंती साजरी झाली.

मा. मुख्याध्यापिकांच्या उपस्थितीत पालक शिक्षक संपर्क समितीची सभा झाली.

दि. २६/७/०९ रोजी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची १०९वी जयंती साजरी करणेत आली.

लो. टिळक पुण्यतिथी साजरी झाली.

दि. ६/८/०९ रोजी हिरोशिमा दिन साजरा करण्यात आला.

दि. ९/८/०९ रोजी क्रांतीदिन साजरा करण्यात आला.

दि. ५/९/०९ रोजी डॉ .सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षकदिन म्हूणन साजरा करण्यात आला.

दि. १४/९/०९ रोजी हिंदी दिन साजरा करण्यात आला.

दि. १९/९/२००९ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे घटस्थापना, मूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रम प्रसिध्द उद्योगपती मा. व्ही.एन. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या शुभहस्ते झाले. विज्ञान प्रदर्शनाचेही उद्‌घाटन झाले. दि. २५/९/०९ रोजी मातृदिन साजरा झाला. यावेळी रांगोळी, कार्यानुभव, विज्ञान व व्यवसाय मार्गदर्शन इ. ची प्रदशनि मांडण्यात आली. विद्यार्थिनी दिनही यांच दिवशी साजरा झाला. खंडेनवमी दिवशी घट हलवून महोत्सवाची सांगता झाली.

दि. २/१०/०९रोजी म. गांधी जयंती व लालबहाद्दूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

व्दितीय सत्रात दि. १४/११/२००९ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन साजरा करणेत आला.

दि. २५/११/०९ करवीर संस्थापिका छ.महाराणी ताराराणी पुण्यतिथी साजरी करणेत आली.

दि. २८/११/०९रोजी म. फुले यांची ११९वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

दि. १/१२/०९रोजी जागतिक एडस् दिनानिमित्य घोषवाक्य व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

दि. ६/१२/०९रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ५२वा महानिर्वाणदिन साजरा करण्यात आला. दि. २६/१२/०९ रोजी शालेय पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. दि. ३/१/१० रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. दि. १७/१/१० रोजी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा १५वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

दि. २३/१/१० रोजी देणगीदार पारितोषिक वितरण समारंभ मा. महापौर श्री. सागर चव्हाण यांचे शुभहस्ते करणेत आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री. डॉ. क्रांतीकुमार पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते. दि. २३/१/१० रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. दि. ८/२/२०१० दहावी विद्यार्थिनींचा शुभेच्छा समारंभ घेण्यात आला. दि. १९/२/२०१० छ. शिवाजी महाराज जयंती साजरी करणेत आली. दि. २०/२/२०१० म. फुले जन्मदिन साजरा करणेत आला. दि. २२/२/१० रोजी बेड्न पॉवेल दिन संपन्न झाला. दि. ८/३/२०१० रोजी जागतिक महिला दिन साजरा झाला.

तुकाराम बीज हा कार्यक्रम संपन्न झाला. दि. २८/४/२०१० रोजी कै. सौ. सरोजिनीदेवी पाटील तथा काकीजी यांची जयंती समारंभ संपन्न झाला. दि. १ मे १० रोजी महाराष्ट्र दिन साजरा करणेत आला.

**संचयिका :-**

शाळेतील विद्यार्थिनींना बचत करता यावी यासाठी संचयिका विभाग सुरु आहे. बुधवारी व शुक्रवारी संचयिकेचे कामकाज या दोन दिवशी सुरु असते. ५वी व ८वीच्या नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना पासबुक व नंबर देवून एकूण २६० नवीन खाती सुरू केली. मुदतबंद खातेवरील शिल्लक १०८६०/- इतकी असून बँकेतील रोजच्या व्यवहारासाठी ठेवणेत आलेली शिल्लक रू. १३४/- इतकी आहे. अशाप्रकारे संचयिकेचे कामकाज उत्तम चालते.

**बाह्य परीक्षा :-**

प्रथम सत्रात गणित व हिंदी या विषयांच्या बाह्य परीक्षा झाल्या.

१)गणित बाह्य परीक्षा पहिली व दुस-या परीक्षेत एकूण ७८ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. तसेच तिस-या परीक्षेत ९१ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या.

राष्ट्रभाषा हिंदी बालबोधिनी ४६ , प्राथमिक ४२ व प्रवेशिका ४८ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. संस्कृत तृतिया ८१ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या.

इंग्रजी बाहय परीक्षा : प्रि इलिमेंटरी : एकूण १५० विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या.

एलिमेंटरी परीक्षेस १३१ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या व ज्युनिअरसाठी ५८ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. सर्व विद्यार्थिनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या. असे सुयश विद्यार्थिनींनी मिळविले.

**स्पर्धा विभाग :-**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना संधी देउन त्यांच्यातील कला कौशल्यांना विकसित करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. हस्ताक्षर, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, हस्तलिखित, स्वरचित काव्य तसेच पाठांतर, नाटयवाचन, एकांकीका, समूहगीत या स्पर्धा शालेयस्तरावर घेतल्या गेल्या तसेच बाहय स्पर्धामध्येही विद्यार्थिनींनी पारितोषिके मिळविली.

संस्कृत नाटयप्रवेश संघाला उत्तेजनार्थ क्रमांक, वैयक्तिक अभिनयाचा उत्तेजनार्थ क्रमांक कु. शरयु बनकर ७ड हिने मिळविला. यामध्ये शाळेच्या सहा.शिक्षिका श्रीमती जयश्री दानवे यांना लेखनाचा व्दितीय क्रमांक

मिळविला. राधाबाई शिंदे स्कूल फेस्टिव्हलमध्ये शाळेच्या सहा. शिक्षिका सौ. पाटील एस.एस. यांनी दिग्दर्शित केलेल्या मुक्तीची वाट या नाटकास प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

इंदूमतीदेवी स्मृति स्पर्धा लहान गट मराठी वक्तृत्व स्पर्धेत कु. श्यामली उन्मेष साठे हिचा प्रथम क्रमांक आला. बक्षीस रक्कम रू. ४२६/- व फिरती ढाल व प्रमाणपत्र प्राप्त झाले. मोठया गटात कु. सायली प्रमोद पाटील १०ड हिला प्रथम क्रमांकामध्ये बक्षीस रक्कम रू. ४२६/- व फिरती ढाल व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

श्री. काडसिध्देश्वर शिक्षणसंस्था कणेरी वक्तृत्व स्पर्धेत कु. शर्वरी शिवाजीराव पाटील हिला उत्तेजनार्थ क्रमांकाचे प्रमाणपत्र मिळाले. भिमा फेस्टिवल चित्रकला स्पर्धा कु. प्रियांका संभाजी पडवळ हिला तृतीय क्रमांकाचे ढाल प्रमाणपत्र व रंग साहित्य बक्षीस मिळाले. चंद्रकुमार नलगे वाचनालय उजळाईवाडी वक्तृत्व स्पर्धेत लहान गटामध्ये कु. प्रियांका संभाजी पडवळ हिला उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला यामध्ये ढाल, प्रमाणपत्र रोख ५० रू. मिळाले, राधाबाई शिंदे स्कूल वक्तृत्व स्पर्धेत कु. श्यामली साठे ७ड हिला तृतिय क्रमांक मिळाला व चेहरा रंगविणे या स्पर्धेत चार मुलींना प्रथम क्रमांचे बक्षीस मिळाले. बी न्यूज व भागीरथी महिला संस्था यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत लहान गटामध्ये कु. श्यामली उन्मेष साठे ७ड हिने प्रथम क्रमांक मिळविला. तिला प्रमाणपत्र, ढाल व रोख ५००/-रू बक्षीस मिळाले. मोठया गटात कु. स्नेहल द. जाधवर हिला उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला. मुख्याध्यापक संघ आयोजित समूहगीत स्पर्धेत शाळेने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. ग्रंथदिंडीमध्ये आपल्या शाळेच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच शाळेला भूषणावह असलेले स्वेशन चाईल्ड कु. आरती पाटील हिने राज्य पॅरॉलिंपिक क्रीडा असोशिएशन, नागपूर येथून राज्य पॅरा खेळाडू २००९ हा पुरस्कार मिळविला.

**चित्रकला :-**

कला सागर आर्ट संकूल यांचेतर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेमध्ये ८० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. बक्षीसे मिळविलेल्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे.

**गट ५वी ते ७वी -**

कु. पृथा प्रकाश चपाले ७ड प्रथम
कु. मोनिका महादेव पोवार ५क व्दितीय
कु. शरयु शाहू बनकर ७ड तृतिय

**गट ८वी ते १०वी -**

कु. सृष्टी सुरेश पाटील १०ड प्रथम
कु. चैत्राली नंदकुमार गुरव १० क व्दितीय
कु. प्रज्ञा यशवंत हवालदार ८ड तृतीय

कृषी खात्यातर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेमध्ये तालुकास्तरीय कु. क्षितिजा दादासाहेब टोणे ७ड या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळविला. तिला रू. ३००/- चे रोख पारितोषिक मिळाले तसेच याच स्पर्धेमध्ये तिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून रू. ५००/- चे रोख पारितोषिक मिळविले.

**कोलाज(क्राफ्टी ग्लु) स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये बक्षीसे मिळविलेल्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे**

१. यशश्री रविंद्र शिंगाडे ५ड
२. वैदेही संजय साळुंखे ६ब

३. पूनम उध्दव ढाकणे, ७ई
४. निहारिका अमित साळुंखे, ५ड
५. पृथा प्रकाश चपाले, ७ड
६. प्राजक्ता बसगोंडा स्वामी, ७ड
७. कल्याणी चंद्रकांत पारगावकर, ७क
८. गौरी विजय पाटील, ५ड
९. आदिती प्रसन्न माने, ५ड
१०. सायली निवास गुरव, ९ब
११. जब्बीन शकिल कोतवाल, ८फ

**कॅमल चित्रकला स्पर्धा :-**

स्पर्धेमध्ये ५वी ते १०वी च्या सर्व विद्यार्थिनींचा सहभाग :-

**इ. ५वी ते ७वी**

१) कु. पाटील राजश्री ज्ञानदेव, ७वी अ प्रथम
२) कु. खामकर अमृता आप्पासाहेब, ६वी ड द्वितीय
३) कु. पाटील श्रध्दा संदीप, ६अ तृतीय
४) कु. तराळ प्रेरणा अरविंद, ७ई, चौथा
५) कु. चव्हाण स्नेहल राजेंद्र, ७ वी पाचवा

**इ. ८वी ते १०वी**

१) कु. सोनल हेमंत संकपाळ, १०अ प्रथम
२) कु. चैत्राली नंदकुमार गुरव, १०क द्वितीय
३) कु. स्वाती सुभाष गडेकर, ८ड तृतीय
४) कु. क्रांती अविनाश जाधव, ९क चौथा
५) कु. प्रज्ञा यशवंत हवालदार, ८ड पाचवा

**भवानी उत्सवा अंतर्गत कला प्रदर्शन व कोलाज स्पर्धा ५वी ते ७वी गट :-**

१) सलोनी प्रविण पाटील ६अ, प्रथम विभागून
२) अनिता चंद्रकांत भेंडेगिरी, ७अ प्रथम विभागून
३) पुजा सुर्यकांत साळुंखे, ७ई व्दितीय
४) अंकिता भरत मोरे, ५ड तिसरा
५) मानसी आनंद उरूणकर, उत्तेजनार्थ

**गट ८वी ते १०वी :-**

१) ऐश्वर्या शरद गवळी, ८क प्रथम विभागून
२) गायत्री नार्वेकर, ८क प्रथम विभागून
३) रचना संकपाळ, ७क तृतिय क्रमांक
४) पाटील प्रियांका शिरीष, १०क तिसरा क्रमांक
५) भक्ती उदय कदम, ८ब उत्तेजनार्थ

**सकाळ चित्रकला स्पर्धा बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे -**

**५वी ते ७वी गट :**

१) वैष्णवी विलास शिंदे ७ड प्रथम
२) अमृता आप्पासाो खामकर ६ड व्दितीय
३) सुखदा विजय घेवारी ७ड उत्तेजनार्थ
४) प्रियांका संभाजी पडवळ ६ड उत्तेजनार्थ
५) शर्मिष्ठा धनंजय पाटील ६ड प्रथम

**८वी ते १०वी गट :**

१) प्रज्ञा यशवंत हवालदार ८ड तृतिय
२) चैत्राली नंदकुमार गौरव १०क तृतिय

**एन. सी. सी. :-**

दरवर्षी प्रमाणे इ. ८वी, ९वीच्या मिळून १०० विद्यार्थिनी एन.सी.सी. मध्ये आहेत. इ. ८वीच्या ४२ व इ. ९वीच्या ५८ विद्यार्थिनी आहेत.

१) आपल्या शाळेतील ए.टी.सी.कँप २ व आर.डी. सी. कँप साठी २ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. एन. आय. सी. कॅम्पसाठी ३ विद्यार्थिनींची निवड झाली. मालवणकर शूटींग कॅम्पसाठी ४ विद्यार्थीनींची निवड झाली.

**२) एम.सी.सी. :-**

१) शासकीय गट पातळीवरील स्पर्धेत कवायत स्पर्धेमध्ये शहरस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला व जिल्हास्तरावर निवड झाली.

**आर. एस. पी. :-**

आर.एस.पी.च्या एकूण ७० मुली आहेत. इ. ९वीच्या मुलींचा कॅम्प दोन्ही स्तरावर घेतला. त्यामध्ये बेस्ट संचलन व्दितीय क्रमांक, वाहतूक सुरक्षा सप्ताहनिमित्य पोलीसालयातर्फे विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये आपल्या शाळेच्या विद्यार्थिनींनी पुढीलप्रमाणे यश संपादन केले. घोषवाक्य स्पर्धा व चित्रकला स्पर्धेमध्ये व्दितीय क्रमांक मिळाला.

**जिमखाना विभाग - क्रीडा विभाग :-**

जुलै २००९ मध्ये शालेय जिमखाना निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने उत्साहात पार पडली. यामध्ये जनरल सेक्रेटरी पदासाठी कु. शर्वरी मंडले इ. १०वी ड व उपजनरल सेक्रेटरी पदासाठी कु. योगिता येडूरकर व तारा दिवेकर १०क या दोन विद्यार्थिनींची निवड झाली.

यानंतर ऑगस्ट २००९ पासून शालेय शासकीय स्पर्धांना सुरुवात झाली. यामध्ये आमच्या शाळेने सांघिक व वैयक्तिक खेळामध्ये सहभाग घेऊन उत्तम प्रतीचे यश मिळविले.

क्रीडा क्षेत्रातील प्रावीण्य हे तर आमच्या शाळेचे खास वैशिष्ट्य आहे. मुलींच्या बौध्दिक विकासाबरोबर त्यांचा शारीरिक विकास व्हावा ही आज काळाची गरज बनत चालली आहे. शालेय विषयाला खेळाची जोड असलीच पाहिजे. चालूवर्षी आमच्या शाळेने सांघिक व वैयक्तिक खेळांमध्ये भाग घेवून भरघोस असे यश संपादन केले आहे.

**जलतरण स्पर्धा जिल्हास्तरीयः-**

कु. ऐश्वर्या भरत चौगुले व कु. ऋतुजा देसाई यांची अमरावती येथे होणा-या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

मैदानी खेळामध्ये ८००मी. धावणे लांब उडी, थाळी फेक व ४ह१००मी. रिलेमध्ये विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच हॉलीबॉल संघाने जिल्हास्तरीय स्पर्धा जिंकून सातारा येथे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**रणरागिणी स्पोर्टस् क्लब**

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने संस्थेतील सर्व शाखेतील सर्व खेळाडू विद्यार्थिनींना तंत्रशुध्द मार्गदर्शन करण्यासाठी रणरागिणी स्पोटर्स क्लब चालविला जातो. यामध्ये अॅथलेटिक्स व व्हॉलीबॉल खेळांचे मार्गदर्शन केले जाते. यामध्ये ४० खेळाडू खेळांचा सराव करतात. सकाळी ७ ते ९ या वेळेत हा सराव केल्याने घवघवीत यश संपादन केले आहे. अॅथलेटिक्स मध्ये विविध खेळामध्ये भाग घेवून शहरस्तर, जिल्हास्तर, विभागीयस्तर, राज्य व राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे.

रणरागिणी स्पोर्टस् क्लबचे कामकाज श्री. मासाळ सर व श्री. सूर्यवंशी सर पाहतात.

**सहल विभाग :-**

प्रथम सत्रात छोटी सहल गणपतिपुळे, पावस व रत्नागिरी येथे शिक्षकांसह गेली. या सहलींचा शैक्षणिक, भौगोलिक, मनोरंजनात्मक दृष्टीकोनातून फारच उपयोग झाला.

**अभ्यासेतर उपक्रम :-**

आमच्या विद्यार्थिनींना अभ्यासाबरोबर नितीमत्ता वाढविणारे मूल्यशिक्षण नियमीतपणे विविध उपक्रमातून दिले जाते. अफाट विश्वाची कांही अंशी माहिती असावी या उद्देशाने सामान्यज्ञान, पर्यावरण हे विषय शिकवीले जातात. विद्यार्थिनींना नवे ज्ञान देण्यासाठी एम.सी.सी., गर्ल गाईड, आर.एस.पी., समाजसेवा, कार्यानुभव, कला, इ. विविध विषयांचे शिक्षण दिले जाते.

**विज्ञान मंडळ :-**

होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेसाठी ६वीच्या ३४ व ९वीच्या ४३ विद्यार्थिनी सहभागी झालेल्या होत्या. त्यापैकी योगिता येडूरकर ९ड, प्रतिभा पाटील ९ड व मिताली जांभळीकर ९ड या विद्यार्थिनींची बाल शिक्षण मंदीर पुणे येथे प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली.

**विज्ञान प्रदर्शन :-**

भवानी महोत्सवांतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मा. बेनाडीकरसाो व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचे शुभहस्ते झाले. या विज्ञान प्रदर्शनात ५वी ते ७वी गट ४७ उपकरणे तयार केली. ८वी ते १०वी गट एकूण ४० प्रयोग मांडले. याचा सर्वच विद्यार्थिनींना वैज्ञानिक दृष्टिकोनातून खूपच उपयोग झाला. यातील प्रथम व व्दितीय क्रमांकाचे प्रयोग शहर विज्ञान प्रदर्शनात पाठविणेत आले.

**शिक्षक पालक संपर्क समिती व पालक मेळावे :-**

पहिली सभा ऑगस्ट २००९ रोजी घेण्यात आली यावेळी शिक्षक पालक संपर्क समितीचे कामकाज व तिचे स्वरुप याबद्दल माहिती देण्यात आली. यावेळी पालकांसाठी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा या विषयावर माहिती देणेत आली. तसेच पालकांनी आपली मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेची माहिती व शिस्त, उपक्रमांविषयी शिक्षकांनी माहिती दिली.

**व्यवसाय मार्गदर्शन :-**

भवानी महोत्सव अंतर्गत मातृदिन व हळदीकूंकू समारंभाचे औचित्य साधून व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रदर्शन भरविणेत आले. यामध्ये स्त्रीयांसाठी असलेले विविध उद्योगधंदे व माहितीचे तक्ते याव्दारे माहिती देणेत आली. तसेच माता पालकांनीही या प्रदर्शनाला भेट देऊन विविध कोर्सची माहिती करून घेतली. १४ जानेवारी हा व्यवसाय मार्गदर्शन दिन साजरा करणेत आला.

**संगणक :-**

संगणक या विषयासाठी शाळेच्या इ. ५वी ते १०वी मधील १०७८ विद्यार्थिनी संगणक प्रशिक्षण घेत आहेत. संगणक विभागामध्ये एकूण २१ संगणक उपलब्ध आहेत. चालू वर्षी बॅटरी पॅकअपची सोय केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना भरपूर सराव मिळतो.

**शालेय पोषण आहार :-**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत इ. ५ वी ते ८वीच्या विद्यार्थिनींना पोषण आहार दिला जातो. रोजचा पोषण आहार हा स्वत: वर्गशिक्षक १० मिनिटाच्या सुट्टीत देत असत. सदरचा आहार हा अन्नपूर्णा महिला बचत गटामार्फत पुरविणेत येतो. तसेच या आहारामध्ये विविधता ठेवण्याचा प्रयत्न होता.

**अभ्यासिका :-**

२ ऑक्टोबर २००५ पासून अभ्यासिका सुरु आहे. याचा वापर इ. १०वीच्या मुलींना अभ्यासासाठी होत होता. तसेच इ. ७वीच्या स्कॉलरशिपच्या मुलींनाही अभ्यासिकेचा लाभ झाला.

**परीक्षा विभाग :-**

५वी ते ८वीची घटक चाचणी व १०वीची सराव परीक्षा २३/७/२००९ पासून घेण्यात आली. इ.९वीची पहिली घटक चाचणी व इ. ५वी ते ८वीची दुसरी चाचणी व इ.१०ची तिमाही परीक्षा पार पडली. १/१०/२००९ पासून इ.५वी ते १०वी या सर्व वर्गांची सहामाही परीक्षा पार पडली. १०/१२/२००९ इ. ५वी ते ८वी तिसरी घटक चाचणी व १०वी बोर्डाप्रमाणे सराव परीक्षा घेण्यात आली. १०वीची पूर्व परीक्षा लिखाणाचा सराव म्हणून घेण्यात आली. तसेच ५वी ते ८वीची चौथी घटक चाचणी इ. ९वीची २री घटक चाचणी ३/२/१० ते ५/२/१० पर्यंत परीक्षा पार पडली. १/४/२०१० पासून ५वी ते ९वीची वार्षिक परीक्षा घेण्यात आली.

**नकाशा अहवाल :-**

इ. ५ वी ते इ. १० वी साठी लागणारे सर्व नकाशे एकत्र केले. इयत्तेनुसार नकाशांची वर्गवारी करुन नोंदणी करण्यात आली. नकाशे व्यवस्थित रहावेत यासाठी पिशव्या घालण्यात आल्या. याचा व्यवस्थित वापर करण्यात आला. नवीन अभ्यासक्रमातील नकाशे बाजारात उपलब्ध होणे अवघड असलेने ओव्हरहेड प्रोजेक्टवरून डॉईंग शिक्षकांकडून तयार करून घेण्यात आले.

**शो - केस विभाग :-**

वर्षातील ऋतुंचे, सणांचे औचित्य साधून शो केस विभाग कार्यरत होता. यामध्ये विद्यार्थिनींनी केलेल्या कविता, तसेच विविध थोरा मोठ्यांबद्दलची माहिती, चरित्रे, वर्तमान पत्रातील महत्वाची कात्रणे, शाळेतील विविध कार्यक्रमांची माहिती, विद्यार्थिनी लिखीत कथा, चित्रे या विविध उपक्रमांची माहिती नियमितपणे शो केस मध्ये लावण्यात आली. शो केस विभागाची नियमितपणे देखभाल आहे. शो केस नियमितपणे विविध माहितींनी समृध्द असलेल्या दिसतात.

**हस्तलिखित विभाग :-**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेचे 'तेजोमय' हस्तलिखित तयार करण्यात आले. त्याला कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला. यासाठी विद्यार्थिनी व शिक्षकांकडून विविध विषयांचे साहित्य मागविण्यात आले. त्यातून योग्य साहित्य व चित्रांची निवड करुन हस्तलिखित तयार करण्यात आले.

**कार्यानुभव विभाग :-**

प्रथम सत्रात शाळेतील महत्वाचा कार्यक्रम म्हणजे भवानी महोत्सव. यामध्ये कार्यानुभव विषयातील वस्तूंचे प्रदर्शन लावण्यात येते. यामध्ये विद्यार्थिनींनी बनवलेल्या वस्तू उदा. बेबी फ्रॉक, स्वेटर्स, गोधड्या, टोप्या, वॉलपीस, आकाशकंदिल, वस्तू प्रदर्शनासाठी व आकाशकंदिल विक्रीकरीता ठेवण्यात आले. तसेच इ. ९वी, १०वी च्या गृहशास्त्र विभागातर्फे खाद्यपदार्थ विक्री स्टॉलवर खाद्यपदार्थ ठेवण्यात आले. गृहशास्त्र विषयाच्या इ. ९वी व इ. १०वी च्या विद्यार्थिनींचे प्रात्यक्षिक झाले. कार्यानुभव विभागामध्ये शिवणकाम, भरतकाम, विणकाम, परसातील बागकाम, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू इ. शिकविले जाते.

**इ. १० वी स्कॉलर बॅच :-**

इ. १०वीच्या ५१ विद्यार्थिनी स्कॉलर बॅचसाठी निवडण्यात आल्या. दिवाळीच्या सुटटीत जादा तासाचे नियोजन करून ३० नोव्हेंबरलाच अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. स्कॉलर बॅचचे सराव पेपर घेण्यास सुरवात केली. त्यांना तज्ज्ञ शिक्षकांकडून वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले. वारंवार सराव परीक्षा घेऊन सर्व विषयांचे पेपर्स सोडवून घेऊन ते इतर शाळांमधील तज्ज्ञ विषय शिक्षकांकडून तपासून घेण्यात आले. याचा विद्यार्थिनींना खूपच उपयोग झाला. स्कॉलरबॅच निरीक्षक मा. श्री. डी. एस. माने (उपमुख्याध्यापक) यांचे प्रोत्साहन मिळाले. तसेच स्कॉलरबॅच प्रमुख श्री. केळुस्कर यांचे व सर्व विषय शिक्षकांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. नवीन अभ्यासक्रम असल्यामुळे परीक्षेचा अंदाज येत नव्हता तरीही शिक्षकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक मुलींची तयारी करून घेण्यात आली. यामधील एकूण ५१ मूलींना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले.

**शिस्त व स्वच्छता :-**

शिस्त व स्वच्छता विभागातर्फे वेळोवेळी विद्यार्थिनींच्यासाठी शिस्त व युनिफॉर्म संदर्भात सूचना देणेत आल्या. तसेच इ. ५ वी व इ. ८ वीच्या नवीन विद्यार्थिनींची वैद्यकिय तपासणी करण्यात आली. व त्यांच्यातील दोष पालकांना कळविण्यात आले. वैयक्तिक आरोग्य व स्वच्छता संबंधी विशेष काळजी घेण्याबद्दल वर्षभर

मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या.

**माईक विभाग :-**

शाळेमध्ये साजरे केले जाणारे विविध उपक्रम, जयंती, पुण्यतिथी, सांस्कृतिक कार्यक्रम, दैनंदिन प्रार्थना, सूचना, विद्यार्थिनींचे अभिनंदन, बक्षीस समारंभ इ. अनेक कार्यक्रमांसाठी माईक विभाग काम करतो. वेळोवेळी खराब साहित्य दुरुस्त केले जाते.

**ग्रंथालय :-**

ग्रंथ, वाचक आणि ग्रंथपाल या त्रिमूर्तीचे मंदिर म्हणजे 'ग्रंथालय' विद्येचे मंदिर व ज्ञानाचे माहेरघर म्हणजे 'ग्रंथालय'. वाचकांच्या अभिरुचीस जपणारे केंद्र म्हणजे 'ग्रंथालय'. आमच्या उषाराजे हायस्कूलचे ग्रंथालय या चौकोटीत पक्के बसले आहे. हायस्कूलच्या विद्यार्थिनींना सुसंस्कृत करण्याचे काम ग्रंथालय करते. येथील ग्रंथसंग्रह व दर्जेदार संदर्भ सेवा सर्वांना उपयोगी पडणारी आहे.

शिक्षक व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अशी पुस्तकपेढी येथे उपलब्ध आहे. आपल्या ग्रंथालयात दै. पुढारी, दै. सकाळ, दै. तरुणभारत, दै. लोकमत, शिक्षण संक्रमण, शिक्षक आणि समाज, महाराष्ट्र एज्युकेशनल जर्नल, मासिके व विविध अंक घेतले जातात. त्याचा फायदा विद्यार्थिनी व शिक्षकांना होतो. प्रत्येकवर्षी ग्रंथालयात पुस्तकांची अधिक भर पडतच आहे. ग्रंथालयातील भव्यता व सुसज्जता पाहून मन भारावून जाते.

ग्रंथालयातील एकूण पुस्तकांची अंदाजे संख्या १५००० इतकी आहे. तसेच सर्व पुस्तकांची अंदाजे किंमत तीन लाख रुपये इतकी आहे. अशा सुसज्ज ग्रंथालयाचा उपयोग सर्वांनाच होत आहे.

**रोपवाटिका विभाग :-**

रोपवाटिका विभागाचे कामकाज व्यवस्थित चालू आहे. रोपवाटिकेत एकूण ४० कुंड्या झाडे असलेल्या आहेत.

**प्रसिध्दी विभाग :-**

उषाराजे हायस्कूलमध्ये घडणाऱ्या महत्वपूर्ण घडामोडींना प्रसिध्दीच्या झोतात आणण्याचे काम प्रसिध्दी विभाग करीत असतो. शहरातील दै. पुढारी, दै. सकाळ, दै. तरुणभारत, दै. लोकमत या विविध वर्तमानपत्रातून फोटोसहित महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय अशा बातम्या वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या आहेत. त्या बातम्यांची कात्रणे काढून ग्रंथालयातील फाईलमध्ये ठेवलेली आहेत.

**मान्यवरांच्या भेटी :-**

१) संस्थेचे अध्यक्ष - मा. रामराव बेनाडीकर साहेब

२) संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष - मा. रा. कृ. कणबरकर साहेब

३) संस्थेचे सेक्रेटरी - मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब

४) संस्थेच्या विश्वस्त व शाळेच्या माजी मुख्याध्यापिका -मा. श्रीमती व्ही.पी. निकम पाटील मॅडम

६) शिक्षणाधिकारी(माध्य) - मा. श्री. चिखलीकरसो

७) महापौर - मा. श्री. सागर चव्हाण

८) केंद्र समन्वयक - मा. श्री. एच. आर. पाटील

५वी ते इ. १०वी पर्यंतच्या सर्व वर्गांचे प्रत्येक परीक्षेनंतर पालक मेळावे भरविले जातात. शिक्षक-पालक संपर्क समित्या स्थापन केलेल्या आहेत. इ. ८ वी पासूनच स्कॉलर बॅचचे वर्ग घेतले जातात. या कामी सर्व शिक्षकांचे व पालकांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

या यशाचा दीप असाच पुढे अधिकाधिक प्रज्वलित करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात अधिक भर टाकून कै. ती. स्व. काकाजींची स्वप्ने पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहोत.

''आंम्हाला हे जे भरघोस यश लाभलेले आहे त्याचे श्रेय आमची स्फूर्तीस्थाने असणारे कै. ती. स्व. काकाजी व कै. ती. स्व. काकीजी यांनाच आहे.''

ताराराणी विद्यापीठाचे मा. अध्यक्ष, मा. कार्यकारी अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सेक्रेटरी साहेब, पालक व हितचिंतक यांचे आंम्हाला सदैव बहुमोल असे मार्गदर्शन लाभत असल्यानेच आमची शाखा दिवसें-दिवस अधिकाधिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

**सौ. व्ही. एन. पोवार**
मुख्याध्यापिका,
उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# कुमार भवन, कडगांव

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

कै. डॉ. रावसाहेब व्ही. टी. पाटील तथा ती. काकाजी यांच्या भुदरगड तालुक्यातील कार्याचे स्मारक म्हणून 'कुमारभवन कडगांव' ही शाखा माहे जून १९६० पासून कार्यरत आहे.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात शाखेचे कामकाज दि. १२ जून २००९ पासून सुरू झाले. सन २००९-१० मध्ये एकूण पटसंख्या ४५३ असून इयत्ता ५ वी ते १० वी च्या एकूण ०९ तुकड्या आहेत.

शालेय अभ्यासक्रमाबरोबरच इतर अनेक अभ्यासपुरक कार्यक्रम आयोजित करुन विद्यार्थ्यांवर सुसंस्कार घडवून त्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न केला जात आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे शालेय वर्षारंभी ताराराणी विद्यापीठाची स्फुर्तीदेवता कै. सौ. काकीजींची पुण्यतिथी व संस्थेचे शिल्पकार कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांची जयंती साजरी झाली या उभयतांच्या कार्यापासुन स्फुर्ती मिळावी ह्या हेतूने त्यांच्या कार्याचा गुणगौरव करण्यात आला.

गुरूपौर्णिमा, छ. शाहू जयंती, लो. टिळक पुण्यतिथी, क्रांतीदिन, रक्षाबंधन, गणेशोत्सव, म. गांधी जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, शिवजयंती जयंती अशा दिन विशेषा प्रसंगी प्रतिमापुजन व या महान व्यक्तिंच्या गुणांचे संकीर्तन विद्यार्थी व शिक्षकामार्फत करण्यात आले.

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, व महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहन व संचलन घेण्यात आले. कै. काकाजींची जयंती व कै. काकाजींची पुण्यतिथी परंपरेप्रमाणे साजरी करण्यात आली.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात जिमखाना मंडळाची निवडणूक गुप्तमतदान पद्धतीने घेण्यात आली. त्यामध्ये जी. एस. पदी महेश लळेगड्डी (इ. १० वी) व कु. परवीन मकानदार यांची उप-जी. एस. पदी निवड झाली.

**चित्रकला विभाग : -**

सन २००९-१० या वर्षामध्ये कला विभागा तर्फे वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याच बरोबर इतर चित्रकला स्पर्धांनाही विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिलला.

शासकीय रेखाकला (ग्रेड परिक्षा) परीक्षेमध्ये एकूण ५५ विद्यार्थी सहभागी झाले. पैकी इलिमेंटरी साठी २४ विद्यार्थी व एंटरमिजीएट साठी ३१ विद्यार्थी सहभागी झाले. इलिमेंटरी ६६.६७ व इंटरमिजीएट ४४.९३ टक्के निकाल लागला.

एम.सी.सी. छात्रसेना चित्रकला स्पर्धेमध्ये योगेश मानसिंग मांगले या विद्यार्थ्याने तालुका स्तरावर प्रथम

क्रमांक मिळवला व त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

नवनीत चित्रकला स्पर्धा करीता १२८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे आयोजन आपले प्रशाळेत करण्यात आले.

**प्रसिध्दी विभाग :-**

शैक्षणिक वर्ष २००९-१० या वर्षामध्ये कुमार भवन कडगांव या प्रशाले मध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याची प्रसिध्दी व्हावी या उद्देशाने प्रसिध्दी विभागाच्या वतीने वेळोवेळी वृत्तपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या. त्याच बरोबर एम.सी.सी., चित्रकला, निबंध, भाषण स्पर्धांचे ही निकाल वर्तमान पेपर मधून प्रसिध्द झाले.

**विज्ञान प्रदर्शन :-**

सन २००९-१० या या शैक्षणिक वर्षामध्ये म्हसवे, ता. भुदरगड येथे 'तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन' भरविणेत आले. या करीता आमचे शाळेने लहान गटात - २ व मोठ्या गटात २ विज्ञान साहित्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ३ विद्यार्थ्यांच्या प्रश्नमंजुषासाठी तिसऱ्या फेरीपर्यंत यश मिळविले.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये शिक्षकांनी सहभाग घेतला. यामध्ये श्री. फुटाणे आर. के. यांना ''अनियमीत आव्हत्याचे क्षेत्रफळ'' या शैक्षणिक साहित्यास 'तृतीय क्रमांक' प्राप्त झाला.

**स्काऊट गाईट : -**

आजचा विद्यार्थी आपले जीवन जगत असताना तो स्वावलंबी बनावा, स्वावलंबी जीवन व्यतीत करावा हा उद्देश व हेतू प्रत्येक स्काऊट/गाईड विद्यार्थ्याचा असतो. गेली २-३ वर्षे हा शाळेने नवीन योजना सूरू केली. हा उपक्रम श्री. कवठे आर. एम. व सौ. भावना एम. झेंड राबवितात. दोघांनीही याचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे.

त्यानुसार ते शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात. दि. २७-०६-२००ढ रोजी 'वाचन संस्कृती' जोपासली जावी, वाचनाचे महत्व वाढविण्याच्या दृष्टीने 'ग्रंथ दिंडी' चे आयोजन करणेत आले. या ग्रंथदिंडीस गावातील संपूर्ण माळकरी वर्ग, विद्यार्थी (निरनिराळ्या भुमिकेत) सहभागी झाले होते. या वेळेस ग्रामस्थांनीही चांगला प्रतिसाद दिला.

समाज सेवा करावी या करिता ०-६ वयोगटातील सर्व बालकांना 'पोलीओ मुक्त करावे' या करीता कडगाव गावातून स्काऊट-गाईड च्या विद्यार्थ्यांनी दि. ९-१-२०१० रोजी 'पल्स पोलिओ मोहिम' जनजागरण फेरी काढणेत आली.

'वाहतूक सुरक्षा दिन' - वाहतुकीचे महत्व सर्वांना समजावे या करीता हा दिन पाळणेत आला.

**राष्ट्रीय हरीत सेना :**

माहे जून मध्ये राष्ट्रीय हरित सेनेची स्थापना व सदस्यांची निवड करणेत आली व इको क्लब उपक्रमाची कार्यवाही केली. (शुन्य कचरा)

त्यानंतर प्रति महिना वेळोवेळी बीया रोपण करणे नागपंचमी निमीत्त 'सर्प मित्र' व्याख्यान. 'रक्षा बंधन'

निमित्त वृक्षांना राखी बांधणेत आल्या. सामाजीक वनीकरणविभागा मार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले.

पर्यावरण जनजागृतीसाठी प्रतिज्ञा पत्र पालकाकडून घेण्यात आलीत. दसऱ्याच्या निमित्ताने शमीच्या वृक्षाचे महत्त्व कथन करणेत आले.

वन्यजीव सप्ताह निमित्त प्रकल्प तयार करणे वन्यजीव चित्र प्रदर्शनाचे आयोजन करणे. फटाके कमी वापरण्याचे आव्हान (प्रदूषण टाळणे)

ग्रामस्थांच्या मोहिमेमध्ये गावातील रूग्णालय, ग्रामपंचायत, तलाठी ऑफिस, ग्रामदैवत परिसर स्वच्छ केला.

**स्पर्धा परीक्षा : -**

सन २००९-१० या शै. वर्षामध्ये वेळोवेळी शालांतर्गत व शालाबाह्य विविध स्पर्धांमध्ये भाग घेणेत आले.

तालुकास्तरीय 'विज्ञान वक्तृत्व स्पर्धा' गारगोटी हायस्कूल गारगोटी येथे पार पडल्या यामध्ये 'चांद्रयान अपेक्षा व परिणाम' या विषयासाठी कु. हिना काझी (इ. ७ वी), हीने सहभाग घेतला.

MTS परीक्षा जळगांव, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, हस्ताक्षर स्पर्धा, कथावाचन स्पर्धा, नाट्यावाच स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, समूहगीत स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांची उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे 'चॅनेल बी' तर्फे 'बाह्य सामान्य ज्ञान स्पर्धा' आयोजित केल्या होत्या. यामध्ये कु. हिना काझी, इ. ७ वी व मनोज देसाई, इ. ७ वी यांची पुढील 'बी क्वीझ' साठी निवड झाली आहे. सदरचे प्रेक्षपण टी.व्ही. वर 'बी चॅनेल' मध्ये दाखविणेत आले होते.

**इयत्ता दहावी : -**

इयत्ता १० वी मार्च २०१० च्या परीक्षेस एकूण ८२ विद्यार्थी बसले होते पैकी ६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यामुळे शाळेचा निकाल ८०.४८% इतका लागला असून कु. सुषमा शंकर कोटकर हीला ९१.२७% गुण मिळवून शाळेमध्ये प्रथम आली.

**भेटी :**

अहवाल सालात शाळेस उपशिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख विस्तार अधिकारी इ.च्या भेटी झाल्या.

**श्री. एम. डी. किल्लेदार**
मुख्याध्यापक,
कुमारभवन, कांडगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

सरस्वती देवीला वंदन करून व कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी व कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकाजी यांच्या पवित्र स्मृतीस वंदन करुन आज मी प्रिन्स शिवाजी विद्यालय या माझ्या शाखेचा अहवाल आपल्यापुढे सादर करीत आहे.

करवीर राज्य संस्थापिका, हिंदवी स्वराज्य संरक्षिका रणरागिणी छत्रपती महाराणी ताराराणींच्या नावे सन १९४९ साली ताराराणी विद्यामंदिर या शाखेची स्थापना झाली. सन १९९७ साली आमच्या शाळेचे नाव प्रिन्स शिवाजी विद्यालय असे करण्यात आले.

चालू साली इ. १ली ते ४थी पर्यंत १२ वर्ग असून ७४२ विद्यार्थिनी शिकत आहेत. सर्व सोयींनीयुक्त अशी प्रशस्त इमारत व निसर्गरम्य परिसर यांना लाभला आहे.

मुलींचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शाळेत विविध शैक्षणिक विषयाबरोबरच इतरही उपक्रम राबविले जातात. वर्षाच्या सुरूवातीला वर्ग सेक्रेटरी, जनरल सेक्रेटरी यांची निवड निवडणूक पद्धतीने करुन मुलींना लोकशाहीची ओळख करुन दिली. चालू शैक्षणिक साली इ. ४ थी मधील कु. श्रावणी विजय मंत्री जनरल सेक्रेटरी व कु. वैष्णवी राजाराम पाटील उपजनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आल्या. मुलींच्यामध्ये सभाधीटपणा येण्यासाठी विविध बालसभा घेऊन आपल्या देशात होऊन गेलेल्या थोरांच्या कार्याची ओळख करुन दिली जाते.

मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून भवानी महोत्सवात पाठांतर, कथाकथन, हस्ताक्षर, रांगोळी, चित्रकला, क्रीडास्पर्धा अशा स्पर्धा घेतल्या जातात. शालेय स्पर्धांबरोबरच आमच्या मुली बाह्यस्पर्धेत विशेष चमकतात.

यावर्षी शहरस्तरावर घेण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात आमच्या शाळेने 'गणिती खेळ' हे साहित्य मांडले होते. त्यामध्ये त्याचा तृतीय क्रमांक आला.

तसेच जिल्हा स्कॉलरशिप परीक्षेत आमच्या शाळेतील ४५ विद्यार्थिनी बसल्या. शाळेचा १००% निकाल लागला त्यामध्ये कु. निहारिका अमित साळुंखे ही दहाव्या क्रमांकाने व कु. ऐश्वर्या गुलाबराव झांबरे ही बाराव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

आमच्या मुली ज्याप्रमाणे अभ्यासामध्ये यश संपादन करतात, त्याप्रमाणे बाह्यस्पर्धेतही त्या आघाडीवर असतात.

प्राथमिक शिक्षक मंडळाने आयोजित केलेल्या ६०व्या आंतरशालेय क्रीडा सामन्यामध्ये ५० मि. धावणे,

मध्ये कु. शर्वरी संभाजी डकरे हिचा द्वितीय क्रमांक आला. तसेच सांघिक खेळात

१) रिले ९ वर्षे - द्वितीय क्रमांक २) ११ वर्षे रिले - द्वितीय क्रमांक

३) ९ वर्षे लंगडी - प्रथम क्रमांक

सांस्कृतिक कार्यक्रमात द्वितीय क्रमांक आला. तसेच कॅमल कलर कॉन्टेस्ट व सकाळ बालमित्र चित्रकला स्पर्धा यामध्ये सुध्दा आमच्या मुलींना विशेष यश मिळवले. चालू शैक्षणिक वर्षात विविध मान्यवरांनी आमच्या शाळेला भेटी दिल्या. त्यामध्ये श्री. ए. आर. पोतदार, प्रशासनाधिकारी, प्राथ. शिक्षण मंडळ, कोल्हापूर, श्री. आनंदराव आकुर्डेकर, विस्तार अधिकारी, श्री. एन. के. चव्हाण, उपशिक्षणाधिकारी जि. प. कोल्हापूर इ. मान्यवरांनी विद्यालयाला भेट दिली.

सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेअंतर्गत रोटरॅक्ट क्लब या सामाजिक कार्याची जाणीव असणाऱ्या संस्थेकडून आमच्या शाळेतील गरीब होतकरू ६० विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य देऊन मदत केली.

अशा विविध घटनांच्या माध्यमातून शाळेचा उत्कर्ष साधत आमची शाखा यशस्वी वाटचाल करीत आहे.

आमच्या या वाटचालीत ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष मा. बेनाडीकर साहेब, कार्यकारी अध्यक्ष मा. कणबरकर साहेब व सेक्रेटरी मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब यांचे मार्गदर्शन सतत आम्हाला लाभत असते.

थोरांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य व ताराराणी विद्यापीठाचे स्फूर्ती स्थान असलेले काकाजी व काकाजी यांचे आशीर्वाद आमच्या शाखेला लाभले आहेत. म्हणूनच आम्ही यशस्वी वाटचाल करीत आहोत.

जय हिंद, जय ताराराणी ।

**सौ. अ. का. हवालदार**

मुख्याध्यापिका,

प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# बालभवन

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

ताराराणी विद्यापीठाचे बालभवन म्हणजे कोल्हापूरचे आकर्षण व वैशिष्ट्य होय. येथे माँटेसरी पद्धतीने शिक्षण दिले जाते. यातून बालिकांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

**विद्यार्थीनींची संख्या :**

परिसरानुसार छोट्या गटासाठी ३.३ ते ४.२ या वयोगटातील मुलींना ह्या वर्षी प्रवेश दिला. छोटा शिशू व मोठा शिशू मिळून मुलींची संख्या २५८ इतकी झाली आहे. येथे विद्यार्थिनींच्यावर शैक्षणिक संस्कार करण्यासाठी ५ तज्ज्ञ अनुभव संपन्न शिक्षिका नेमल्या आहेत. तसेच दोन दाई नेमल्या आहेत.

कु. आदिती सचिन ओतार हीस बालभवनची जनरल सेक्रेटरी म्हणून निवड केली.

श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि रंगपंचमी हे कार्यक्रम सर्व मुलींनी उत्साहाने साजरे केले.

शैक्षणिकदृष्ट्या मुलींना माहिती मिळेल अशा कणेरीमठ येथे बालभवनची सहल गेली होती.

**मान्यवरांच्या भेटी :**

शिक्षण विस्तार अधिकारी श्री देशमुख यांनी बालभवनची वार्षिक तपासणी केली. शैक्षणिक प्रगती, राबविलेले उपक्रम, शिस्त, स्वच्छता, अध्यापन कौशल्य, प्राप्त भौतिक सुविधा यांचा एकंदरीत विचार करून त्यांना बालवाडीचा दर्जा उत्कृष्ट वाटला. अशी शेरे बुकात नोंद केली आहे.

या सर्व चांगुलपणाचे श्रेय आमच्या संस्थेचे अध्यक्ष कै. मा. डॉ. श्री. व्ही. टी. पाटील तथा काकाजी तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी कै. सौ. सरोजनीदेवी तथा काकीजी यांना आहे. तसेच त्यांच्या शुभाशिर्वादाने आजचे हे रम्य बालभवन साकार झाले आहे हे नमूद करताना आनंद व अभिमान वटतो.

**श्रीमती मंदा चव्हाण**
संचालिका,
बालभवन, ताराराणी विद्यापीठ,
कोल्हापूर.

*ताराराणी विद्यापीठाचे,*

# सौ. सरोजिनिदेवी विश्वनाथ महिला वसतिगृह
# व
# कमला कॉलेज वसतिगृह, कोल्हापूर.

## वार्षिक अहवाल सन २००९-२०१०

कै. काकाजी तथा डॉ. व्ही. टी. पाटील व कै. सौ. सरोजिनीदेवी व्ही. पाटील यांच्या दातृत्वातून सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ महिला वसतिगृह इ. स. १९५१ साली स्थापन झाले. सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात उषाराजे हायस्कूल मधील ७२, डी. एड्. कॉलेज मधील ५०, कमला कॉलेज मधील ४६ विद्यार्थिनींनी अशा एकूण १६८ विद्यार्थिनींनी प्रवेश केला. कमला कॉलेज विद्यार्थिनी वसतिगृहात कमला कॉलेज मधील ८० विद्यार्थिनींनी व इतर १५ अशा एकूण ९५ विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला.

प्रतिवर्षीप्रमाणे विद्यार्थिनींना मार्गदर्शनपर व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहनपर खालील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१) शासन व शिवाजी विद्यापीठाच्या आदेशानुसार कमला कॉलेजमध्ये रॅगिंग प्रतिबंधक कक्ष, रॅगिंग प्रतिबंधक समिती, Mentoring Cell, भरारी पथक यांची नियुक्ती केली आहे.

२) श्रीमती प्रज्ञा पारीख यांचे हस्ताक्षरातून व्यक्तिमत्व विकास या विषयावरील व्याख्यान २३ सप्टेंबर २००९ रोजी वसतिगृहात आयोजित केले.

३) जुन्या व नविन विद्यार्थिनींसाठी उद्बोधन वर्गाचे दि. २०-०९-२००९ या दिवशी आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. अनघा पाठक, प्रा. श्रीमती उर्मिला इंदूलकर यांनी मार्गदर्शन केले.

४) रांगोळी, मेहंदी, लोककला व कॉमेडी एक्सप्रेस अशा विविध स्पर्धा दि. २६ ते २९ डिसेंबर २००९ रोजी संपन्न झाल्या.

५) प्रा. दिलीप बिरजे, कन्या महाविद्यालय मिरज, या मानसोपचार तज्ज्ञांचा विद्यार्थिनींसाठी समुपदेशनाचा उपक्रम दि. १-१-२०१० रोजी घेण्यात आला.

६) दि. २-१-२०१० रोजी वसतिगृह दिन बक्षिस वितरण व विविध कला गुण प्रदर्शनांच्या कार्यक्रमाने संपन्न झाला.

७) श्री स्वामी रामदेव पतंजली योगपीठाचे योग शिक्षक श्री. एस. आर. खोत यांनी 'एकाग्रतेसाठी योगा' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन दि. २२-०१-२०१० रोजी केले.

८) राधाकृष्ण चॅरीटेबल ट्रेस्ट, संमोहन उपचार व संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील डॉ. मानकर एम. डी. यांनी 'व्यक्तिमत्व विकास व एकाग्रता' या विषयावर दि. २८-१-२०१० रोजी विद्यार्थिनींना समुपदेशन केले.

९) वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या संपर्कात व्यवस्थापन समिती सदस्य व रॅगिंग प्रतिबंधक समिती सदस्य सातत्याने असतात.

१०) भरारी पथक वसतिगृहास नियमितपणे व अचानक भेटी देते.

वरील उपक्रमांसाठी संस्थेचे सेक्रेटरी व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब यांचे मार्गदर्शन व व्यवस्थापन समिती सदस्यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. डॉ. सौ. अनघा पाठक**
वसतिगृह व्यवस्थापन समिती प्रमुख

# TARARANI VIDYAPEETH,

DETAILS PERTAINING TO

| FUNDS & LIABILITIES | RS. Ps. | RS. Ps. |
|---|---|---|
| **TRUST FUND AND CORPUS** | | 524331898.46 |
| Opening Balance | 522683020.46 | |
| Add : During the year (UGC Grants) Girls Hostel | 1648878.00 | |
| **OTHER EARMARKED FUNDS** | | 9405606.50 |
| 1. Scholarship Fund | 366763.00 | |
| 2. Development Fund | 5395799.50 | |
| 3. Bhadrakali Tararani Puraskar Nidhi | 325000.00 | |
| 4. Golden Jubilee Nidhi. | 948425.00 | |
| 5. Adarsha Shikshak Puraskar Nidhi | 10000.00 | |
| 6. UGC Remedial Course Grant | 73520.00 | |
| 7. UGC Equipment Grant | 265492.00 | |
| 8. UGC Entry In Services Grant (Non Recur.) | 500000.00 | |
| 9. UGC Minor Research Grant | 3998.00 | |
| 10. UGC Books & Journals Grant | 230533.00 | |
| 11. UGC Career Oriented Prg. Grant | 456637.00 | |
| 12. UGC Beauty Culture & Therapy Grant | 549439.00 | |
| 13. UGC Enchancement in Exis.Premises | 80000.00 | |
| 14. UGC Competence Building Grant | 40000.00 | |
| 15. UGC Field Work/Study Tours Grant | 80000.00 | |
| 16. UGC Equiptments Main. Grant | 80000.00 | |
| **LOAN** Bank of Mah. For Solar System (Pending 36.A(3)permission) | 181347.00 | 181347.00 |
| **LIABILITIES** | | 1769727-40 |
| 1. Provident Fund (K.C.K.(Sr.)) | 20700.00 | |
| 2. Deposit : Hostel Boarders | 284598.40 | |
| 3. Tararani Vidyapeeth poor aid fund (O.B.) | 12815.00 | |
| 4. Library & Laboratory Deposit, Kamala College, Kolhapur. | 214758.00 | |
| 5. Prince Shivaji Education Society (O.B.) | 123439.00 | |
| 6. Individual Advances : Branches | 60458.00 | |
| 7. Bayana Amount : Contractor | 46885.00 | |
| 8. Security Deposit : Contractor | 543322.00 | |
| 9. Vikas Nidhi : | 252208.00 | |
| 10. Profession Tax | 225.00 | |
| 11. University Exam Centre | 128687.00 | |
| 12. Life Insurance Corp. of India | 18790.00 | |
| 13. Income Tax | 23713.00 | |
| 14. TVP.P.N.S. Pat Sanstha | 39129.00 | |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | 17892692.72 |
| Opening Balance | 13323679.92 | |
| Add : Surplus during the year Transfer from Income & Expenditure a/c | 4569012.80 | |
| | **TOTAL Rs.** | **553581272.08** |

**Dr. K. R. PATIL,** Secretary
Tararani Vidyapeeth, Kolhapur

**R. K. KANBARKAR,** Executive President
Tararani Vidyapeeth, Kolhapur

# KOLHAPUR.

## BALANCE SHEET AS AT 31ST MARCH 2010

| PROPERTY AND ASSETS | | RS. Ps. | RS. Ps. |
|---|---|---|---|
| **IMMOVABLE PROPERTIES** | | | 52326784.00 |
| Opening Balance : | 519301537.00 | | |
| a) Land cost : | 467360400.00 | 467360400.00 | |
| b) Building cost : | 45395528.00 | 49684114.00 | |
| Hostel Building : | 3299919.00 | | |
| Add : During the year | 2262619.00 | | |
| | 50958066.00 | | |
| Less : Dep. @ 2.5% | 1273952.00 | | |
| Dr.V.T.Patil SmrutiBhavan(Work in progress) | | 3245690.00 | |
| Library Building (Work in Progress | | 36580.00 | |
| **INVESTMENT** | | | 23156933.00 |
| 1. Fixed Deposit with Bank of Mah., K.C.K. | | 2446967.00 | |
| 2. Small saving deposit with Government | | 100.00 | |
| 3. Fixed Deposit with Bank of Mah., Kolhapur | | 20085505.00 | |
| 4. Fixed Deposit with Bank of Mah.Vasatigruh | | 484862.00 | |
| 5. Fixed Deposit with Bank of Maharashtra Usharaje poor-aid fund account | | 39499.00 | |
| 6. Fixed Deposit with Bank of Mah. D.Ed. | | 100000.00 | |
| **FURNITURE AND FIXTURES** | | | 3413340.00 |
| Opening Balance : | 3341674.00 | 3177826.00 | |
| Add : Purchase during the year | | | |
| 1. Furniture & Deadstock | 75917.00 | | |
| 2. Library Books. : | 113327.00 | | |
| | 3530918.00 | | |
| Less : Depreciation @ 10%: | 353092.00 | | |
| 3. Solar System : | 59392.00 | | |
| 4. New Solar System : | 235000.00 | | |
| | 294392.00 | | |
| Less : Depreciation @ 20%: | 58878.00 | 235514.00 | |
| **ADVANCES** | | | 2538200.00 |
| Deposit : Kolhapur Municipal Corporation Canteen Building (O.B.) | | 1920.00 | |
| Deposit : Kolhapur Municipal Corporation Library Building (O.B.) | | 9780.00 | |
| Deposti : Coin Box | | 1500.00 | |
| Advance : Smruti Bhjavan Building (In progress) | | 2525000-00 | |
| **CASH AND BANK BALANCES :** | | | 4146015.08 |
| 1. Sanstha | | 167631.82 | |
| 2. Branches | | 3978383.26 | |
| | | **TOTAL Rs.** | **553581272.08** |

**D. Y. BHUMKAR & CO.,** Chartered Accountant

Tararani Vidyapeeth, Kolhapur

# TARARANI VIDYAPEETH,

## DETAILS OF CASH AND

| NO. | PARTICULARS | AMOUNT RS. | AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| 1 | **KAMALA COLLEGE, SENIOR** | | 2337274.41 |
| | Cash in hand | 652.00 | |
| | Bank of Maharashtra : 20155900255 | 91224.94 | |
| | Bank of Maharashtra : 2015500266 | 45679.76 | |
| | Bank of Maharashtra : 20155933189 | 1114447.71 | |
| | P.L.A. Account 254 | 822572.00 | |
| | Canara Bank | 262698.00 | |
| 2 | **KAMALA COLLEGE, JUNIOR** | | 949863.48 |
| | Cash in hand | 5622.76 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur : 07 | 28885.02 | |
| | Bank of Maharashtra : C-37 | 915355.70 | |
| 3 | **USHARAJE HIGH SCHOOL : MAIN** | | 224102.31 |
| | Cash in hand | 118.53 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur 17 | 435.15 | |
| | Bank of Maharashtra : 31 | 223548.63 | |
| 4 | **USHARAJE HIGH SCHOOL : TERM FEE** | | 4006.45 |
| | Cash in hand | 46.45 | |
| | Bank of Maharashtra : 4181 | 3960.00 | |
| 5 | **USHARAJE HIGH SCHOOL : POOR-AID FUND** | | 73612.00 |
| | Bank of Maharashtra - T-50 | 73612.00 | |
| 6 | **USHARAJE HIGH SCHOOL : SPORTS** GRANT ACCOUNT | | 925.00 |
| | Cash in hand | -- | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 31 | 925.00 | |
| 7 | **JUNIOR COLLEGE OF EDUCATION : MAIN** | | 101050.37 |
| | Cash in hand | 297.55 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur : 5 | 81583.50 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 20155940562 | 12629.32 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 20155934592 | 6540.00 | |
| 8 | **JR. COLLEGE OF EDU. TERM FEE ACC.** | | 261.00 |
| | Cash in hand | 261.00 | |
| 9 | **JR. COLLEGE OF EDU. D.Ed. FEE GRANT** | | 80839.00 |
| | Cash in hand | 239.00 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur 60016055808 | 80600.00 | |
| 10 | **JR. COLLEGE OF EDU. D.Ed. OTHER FEE** | | 36925.75 |
| | Cash in hand | 263.75 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur 20155932889 | 36662.00 | |
| 11 | **USHARAJE HIGH. SARVA SHIKSHAN MOHIM** | | 1957.00 |
| | Cash in hand | 2.00 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 5307 | 1955.00 | |
| 12 | **PRINCE SHIVAJI VIDYALAYA : MAIN** | | 1664.90 |
| | Cash in hand | 229.25 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur : 35 | 269.70 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur : 36 | 515.62 | |
| | Union Bank of India, Kolhapur : 475 | 650.33 | |
| 13 | **PRINCE SHIVAJI VIDYALAYA : EXTRA** CURRCULAR ACTIVITIES & TERM FEE A/C | | 4132.10 |
| | Cash in hand | 72.70 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 131 | 4059.40 | |

# KOLHAPUR.

## BANK BALANCE AS AT 31ST MARCH 2010

| NO. | PARTICULARS | AMOUNT RS. | AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| 14 | **PRINCE SHIVAJI VIDYALAYA : SARVA** | | 1593.00 |
| | SHIKSHAN MOHIM A/C | | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 43139 | 1593.00 | |
| 15 | **BALBHAVAN : MAIN ACCOUNT** | | 2472.70 |
| | Cash in hand | 194.32 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kolhapur : 30 | 1632.25 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 29 | 646.13 | |
| 16 | **BALBHAVAN : OTHER & TERM FEE ACCOUNT** | | 10689.70 |
| | Cash in hand | 1.95 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 43122 | 2822.25 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 3381 | 7865.50 | |
| 17 | **KUMAR BHAVAN, KADGAON : MAIN** | | 5624.95 |
| | Cash in hand | 124.00 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kadgaon : 1 | 130.00 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kadgaon : 25 | 5370.95 | |
| 18 | **KUMAR BHAVAN, KADGAON : TERM FEE A/C** | | 1772.40 |
| | Cash in hand | 13.50 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kadgaon : 14 | 1758.90 | |
| 19 | **KUMAR BHAVAN, KADGAON : SCHOOL DEVELOPMENT FUND ACCOUNT** | | 13567.60 |
| | Cash in hand | 21.60 | |
| | K.D.C.C. Bank Ltd., Kadgaon : 635 | 13546.00 | |
| 20 | **KUMAR BHAVAN, KADGAON : BUILDING CONSTRUCTION FUND ACCOUNT** | | 6831.58 |
| | Cash in hand | 8.00 | |
| | Bank of Maharashtra, Kadgaon : 201607 | 1023.08 | |
| | Bank of Maharashtra, Kadgaon : 2012351 | 5800.50 | |
| 21 | **KUMAR BHAVAN,KADGAON -SARVA SHI. ABHI.** | | 3551.50 |
| | Cash in Hand | | |
| | Bank of Maharashtra,Kadgaon : 20219300521 | 3551.50 | |
| 22 | **SOU. SAROJINIDEVI VISHWANATH MAHILA VASATIGRUH : D.ED. COLLEGE** | | 50750.06 |
| | Cash in hand | 11.05 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 20155934047 | 26708.01 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 20155902593 | 24031.00 | |
| 23 | **SOU. SAROJINIDEVI VISHWANATH MAHILA VASATIGRUH : KAMALA COLLEGE** | | 64916.00 |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 3140 | 51799.00 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 3141 | 13117.00 | |
| 24 | **SANSTHA : TARARANI VIDYAPEETH, KOP.** | | 167631.82 |
| | Cash in hand | 46.56 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 43092 | 134806.34 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 43035 | 1218.11 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 43123 | 11719.91 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 2996 | 3565.70 | |
| | Bank of Maharashtra, Kolhapur : 4575 | 16275.20 | |
| | **TOTAL RS.** | | 4146015.08 |

# TARARANI VIDYAPEETH,

## DETAILS PERTAINING TO INCOME & EXPENDITURE

From 1-04-2009 to

| EXPENDITURE | HEAD OFFICE | BRANCHES | AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| **TO EXPENDITURE IN RESPECT OF PROPERTIES** | | | |
| Repair & Maintenance | 72916.00 | | 72916.00 |
| **TO ESTABLISHMENT EXPENSES** | 48000.00 | | 48000.00 |
| **TO LEGAL EXPENSES** | 45373.00 | | 45373.00 |
| **TO AUDIT FEES** | 10000.00 | | 10000.00 |
| **TO MISCELLANEOUS EXPENSES** | | | 122718.00 |
| Postage Expenses | 947.00 | | |
| Travelling Expenses | 10050.00 | | |
| Contingencies | 1398.00 | | |
| Printing Expenses | 9048.00 | | |
| Advertisement Expenses | 23924.00 | | |
| Telephone Charges | 15218.00 | | |
| Remunerations | 24770.00 | | |
| Bank Commission | 5928.00 | | |
| Loan Bank Interest | 2998.00 | | |
| Function & Ceremaines | 23437.00 | | |
| Adarsha Shikshak Purskar | 5000.00 | | |
| **TO DEPRECIATION** | | | |
| Immovable Property : 1273952.00 | | | |
| Furnitures & Fixtures: - 353092.00 | | | |
| Solar System : - 58878.00 | | | 1685922.00 |
| **TO EXPENDITURE ON OBJECT OF THE TRUST (EDUCATIONAL)** (Details Attached) | | | 61795258.40 |
| **TO SURPLUS TO THE YEAR** (Transferred to Balancesheet) | | | 4569012.80 |
| | | **TOTAL Rs.** | **68349200.20** |

**Dr. K. R. PATIL,** Secretary
Tararani Vidyapeeth, Kolhapur

**R. K. KANBARKAR,** Executive President
Tararani Vidyapeeth, Kolhapur

# KOLHAPUR.

ACCOUNT FOR THE YEAR 2009-2010

31-03-2010

| INCOME | HEAD OFFICE | BRANCHES | AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| **BY RENT** | 648244.00 | | 648244.00 |
| **BY INTEREST** | | | 2467429.00 |
| Bank Interest | 1902506.00 | 361231.00 | |
| Post Office Time Deposits | 203692.00 | -- | |
| **BY DONATIONS** | 608000.00 | 9831.00 | 617831.00 |
| **BY GOVERNMENT GRANT** | -- | 56881303.00 | 56881303.00 |
| **BY INCOME FROM OTHER SOURCES** | | | 7734393.20 |
| Fees from students | -- | 1887130.00 | |
| Scholarships | 25000.00 | 459822.00 | |
| Hostel Maintenance Charges | -- | 1508450.00 | |
| Miscellaneous Receipts | 11000.00 | 1716931.20 | |
| Subscription | -- | 12366.00 | |
| Cultural Activities Receipts | -- | 41030.00 | |
| Examination Receipts | -- | 157922.00 | |
| Book Bank Receipts | -- | 33605.00 | |
| S.A. Fund Receipts | -- | 11851.00 | |
| Other Receipts | 285471.00 | 63000.00 | |
| Other Courses Receipts | -- | 977661.00 | |
| Gymkhana Receipts | -- | 81510.00 | |
| Tender Form Fee | 34000.00 | -- | |
| Computer Course Fees | 421900.00 | -- | |
| Membership Subscription | 410.00 | -- | |
| Recovery of Books | -- | 1334.00 | |
| Adarsha Shikshan Puraskar | 4000.00 | -- | |
| | 781781.00 | 6952612.20 | |
| **TOTAL INCOME RS.** | | | 68349200.20 |
| | | **TOTAL Rs.** | **68349200.20** |

**D. Y. BHUMKAR & CO.,** Chartered Accountant

Tararani Vidyapeeth, Kolhapur

# TARARANI VIDYAPEETH, KOLHAPUR.

## DETAILS PERTAINING TO INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 2009-2010 (FROM 01-04-2009 TO 31-03-2010)

### EXPENDITURE ON OBJECTS OF THE TRUST EDUCATIONAL EXPENDITURE

| Sr. No. | PARTICULAR | AMOUNT Rs. Ps. |
|---|---|---|
| 1 | KAMALA COLLEGE : SENIOR | 16450818.00 |
| 2 | KAMALA COLLEGE : JUNIOR | 8836334.00 |
| 3 | USHARAJE HIGHSCHOOL : MAIN ACCOUNT | 20710197.00 |
| 4 | USHARAJE HIGHSCHOOL : TERM FEE ACCOUNT | 178511.00 |
| 5 | USHARAJE HIGHSCHOOL : POOR-AID FUND ACCOUNT | 11440.00 |
| 6 | USHARAJE HIGHSCHOOL : SARVE SHIKSHA ABHIYAN MOHIM | 18200.00 |
| 7 | JUNIOR COLLEGE OF EDUCATION : MAIN ACCOUNT | 4883340.50 |
| 8 | JUNIOR COLLEGE OF EDUCATION : TERM FEE ACCOUNT | 3118.50 |
| 9 | PRINCE SHIVAJI VIDYALAYA : MAIN ACCOUNT | 3823201.00 |
| 10 | PRINCE SHIVAJI VIDYALAYA : EXTRA CULTURAL ACTIVITIES AND TERM FEE ACCOUNT. | 18847.00 |
| 11 | BAL BHAVAN : MAIN ACCOUNT | 129034.00 |
| 12 | BAL BHAVAN : OTHER & TERM FEE ACCOUNT | 37449.00 |
| 13 | KUMAR BHAVAN, : MAIN ACCOUNT | 4006590.00 |
| 14 | PRIN.SHIVAJI VIDYALAY : SARVA SHIKSHAN MOHIM ACCOUNT | 11000.00 |
| 15 | KUMAR BHAVAN, KADGAON : SERV.SHIK.MOHIM A/C | 19998.00 |
| 16 | KUMAR BHAVAN, : TERM FEE ACCOUNT | 22955.50 |
| 17 | JUNIOR COLLEGE OF EDUCATION : OTHER FEE ACCOUNT | 527033.25 |
| 18 | JUNIOR COLLEGE OF EDUCATION : PARTADWARE EDU. A/C. | 1482628.00 |
| 19 | SANSTHA : TARARANI VIDYAPEETH, KOLHAPUR | 624563.65 |
| | **Total Rs.** | **61795258.40** |

**Dr. K. R. PATIL**
Secretary
Tararani Vidyapeeth, Kolhapur

**R. K. KANBARKAR**
Executive President
Tararani Vidyapeeth, Kolhapur

**D. Y. BHUMKAR & CO.**
Chartered Accountant
Tararani Vidyapeeth, Kolhapur

"निर्मातुं शिवं सुंदरम्"

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

## कार्यविस्तार

१) कमला कॉलेज (सिनियर) (आर्टस्, कॉमर्स, होम सायन्स, बी.सी.ए.), कोल्हापूर.
२) कमला कॉलेज (ज्युनियर) (आर्टस्, कॉमर्स, सायन्स), कोल्हापूर.
३) ज्युनि. कॉलेज ऑफ एज्युकेशन. (डी.टी.ई.)
४) उषाराजे गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर.
५) कुमार भवन, कडगाव.
६) प्रिन्स शिवाजी विद्यालय, कोल्हापूर.
७) ताराराणी विद्यापीठ बालभवन, कोल्हापूर.
८) सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ महिला वसतिगृह व कमला कॉलेज वसतिगृह.
९) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र.
१०) ताराराणी विद्यापीठ पगारदार नोकरांची वि. का. सह. सोसायटी लि., कोल्हापूर.
११) श्री. विश्वनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., कोल्हापूर.

---

ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर ही संस्था
मुंबई सरकारच्या पब्लिक ट्रस्ट XXIV अन्वये
ता. १७ जानेवारी १९५५ रोजी रजिस्टर झाली.
प. र. नं. KOP - E - 99

व

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट XXI 1860 अन्वये
ता. १२ एप्रिल १९६१ रोजी रजिस्टर झाली.
रजिस्ट्रेशन नं. NO. BOM. / 157 / KPR

U. P. C. BOOK-POST



प्रती,

श्री. / श्रीमती ______________________

______________________

______________________

■ प्रकाशक : डॉ. क्रांतिकुमार पाटील सेक्रेटरी, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

■ मुद्रक : श्री मुद्रणालय, ११६ ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर. ☎ २६२०६९६

निर्मातु शिवं सुंदरम्

# ताराराणी विद्यापीठ

राजारामपुरी, कोल्हापूर.



## ६१ वा वार्षिक अहवाल
## सन २०१४-२०१५

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

## * संस्थापक *

## मा. कै. डॉ. व्ही. टी. पाटील

## * विश्वस्त मंडळ *


मा. श्री. रा. कृ. कणबरकर ........... कार्यकारी अध्यक्ष (दि. १३/४/२०१५ पर्यंत)

मा. डॉ. एस. एन. पवार.................. उपाध्यक्ष

मा. ॲड. पी. एम. हिलगे................ उपाध्यक्ष

मा. श्रीमती राजलक्ष्मी आ. जाधव...... उपाध्यक्षा

मा. श्रीमती व्ही. पी. निकम-पाटील.... सदस्या

मा. श्री. अशोकराव आर. पर्वते......... सदस्य

मा. श्री. प्राजक्त क्रां. पाटील............ सदस्य

मा. श्रीमती जयश्री श. पाटील............ सदस्या

मा. डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील.......... सेक्रेटरी-पदसिद्ध सदस्य

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

## के. ई. ९९

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरीता)**

ताराराणी विद्यापीठाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक १९/१२/२०१५ या दिवशी दुपारी ठीक ४.०० वाजता ताराराणी विद्यापीठाच्या पश्चिमेकडील इमारतीमध्ये आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१. मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२. संस्थेचा सन २०१४-१५ सालचा वार्षिक अहवाल व सन २०१४-२०१५ या वर्षाची हिशोबपत्रके मंजूर करणे.

३. ऑडिटर्स यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

येणे प्रमाणे असे,

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
सचिव

कोल्हापूर
दिनांक : १८/११/२०१५.

**सूचना :** अहवाल आणि ताळेंबदासंबंधी ज्यांना माहितीवजा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले लेखी प्रश्न संस्थेच्या ऑफिसमध्ये दिनांक ०९/१२/२०१५ पर्यंत पाठवावेत.

# श्रद्धांजली

कै. एपीजे अब्दूल कलाम – माजी राष्ट्रपती

कै. रा. कृ. कणबरकर – कार्यकारी अध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ, माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

कै. गोपीनाथ मुंडे – केंद्रीय मंत्री, भारत सरकार

कै. उदयसिंगराव गायकवाड – माजी खासदार, कोल्हापूर

कै. सदाशिवराव मंडलिक – माजी खासदार, कोल्हापूर

कै. आर. आर. पाटील – माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र सरकार

कै. कॉ. गोविंदराव पानसरे – ज्येष्ठ विचारवंत, कामगार नेते

कै. विक्रमसिंह घाटगे – माजी आमदार, संस्थापक-शाहू साखर कारखाना, कागल

कै. सा. रे. पाटील – माजी आमदार, संस्थापक – दत्त साखर कारखाना, शिरोळ

कै. बॅ. पी. बी. पाटील – जेष्ठ विचारवंत

कै. महिपतराव बोंद्रे – कृषीभुषण

कै. सुभाषराव बोंद्रे – सचिव, राजर्षी शाहू शिक्षण संस्था

तसेच बॉम्बस्फोट, दहशतवादी व नक्षलवादी हल्ल्यात आणि भूकंप, गारपीठ या सारख्या नैसर्गिक आपत्तीत बळी पडलेल्या निरपराध व्यक्तींना, भारतीय सीमेवर लढताना धारातीर्थी पडलेल्या सैनिकांना तसेच ज्ञात अज्ञात यांना

***भावपूर्ण श्रद्धांजली !***

# ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६९ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

ताराराणी विद्यापीठाचा सन २०१४-२०१५ चा वार्षिक अहवाल व हिशोब-पत्रके आपणापुढे सादर करताना विशेष आनंद होत आहे. अहवाल साली संस्थेत आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत.

### विविध कार्यक्रम

ज्ञानाचे पवित्र कार्य करण्यासाठी स्थापन झालेल्या ताराराणी विद्यापीठातील सर्व शाखांचे निकाल हे जवळजवळ ८०% च्या वर असून ६००० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. तर शिक्षणोत्तर अन्य उपक्रमही तितक्याच तन्मयतेने राबविले जातात.

### स्व. ती. सौ. सरोजिनीदेवी तथा काकीजी यांची पुण्यतिथी

प्रथम सत्रात संस्थेच्या माजी उपाध्यक्षा, कै. सौ. सरोजिनी तथा पूज्य काकीजी यांच्या ४५ व्या पुण्यतिथी त्यांच्या त्यागाचे चिरंतन प्रतीक असलेल्या ताराराणी विद्यापीठ व विविध संस्थेच्यावतीने ज्येष्ठ विचारवंत, मा. श्री. गोविंदराव पानसरे यांचे **''राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे महिला शिक्षण विषयक धोरण''** या विषयावर व्याख्यान आयोजित केलेले होते.

### कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची जयंती

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठ, गारगोटी या संस्थाचे संस्थापक, कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा पूज्य काकाजी यांच्या ११४ व्या जयंती निमित्त शुक्रवार, दिनांक १ ऑगस्ट २०१४ यादिवशी जयंती सादर करण्यात आली. या जयंती निमित्त संस्थेच्या शाखांमधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

### भवानी महोत्सव

ताराराणी विद्यापीठात प्रतिवर्षी ''भवानी महोत्सव'' साजरा केला जातो. अहवाल साली भवानी महोत्सव प्रारंभ गुरुवार, दिनांक २५/०९/२०१४ यादिवशी प्रमुख पाहुणे म्हणून मा. अशोकराव आर. पर्वते आणि त्यांच्या

सुविद्य पत्नी सौ. अलका अशोकराव पर्वते यांच्या शुभहस्ते **''घटस्थापना'** करुन करण्यात आली. तसेच या भवानी उत्सवामध्ये **''ललित पंचमी''** आणि **''मातृदिन''** ही साजरी करण्यात आला.

## कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा स्मृतिदिन

कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा पूज्य काकाजी यांच्या विसाव्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०१५ या दिवशी आयोजित केलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारती विद्यापीठाचे कुलपती मा. डॉ. पतंगरावजी कदम हे उपस्थित होते.

## भद्रकाली ताराराणी पुरस्कार

कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा पूज्य काकाजी यांच्या सामाजिक व शैक्षणिक गौरवार्थ सन १९९० मध्ये त्यांना अर्पण केलेल्या निधीचा त्यांच्या इच्छेप्रमाणे **''भद्रकाली ताराराणी पुरस्कार निधी''** निर्माण करण्यात आला. सदर रक्कमेच्या व्याजातून **''भद्रकाली ताराराणी पुरस्कार''** हा द्वैवार्षिक पुरस्कार सामाजिक, राजकीय, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात असाधारण कार्य करणाऱ्या भारतीय महिलेला सन १९९० पासून देण्यात येत आहे.

सन २०१४-२०१५ या वर्षाचा **भद्रकाली ताराराणी पुरस्कार** हेमलकसा, लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी वैद्यकीय व सामाजिक कार्य करणाऱ्या **डॉ. सौ. मंदाकिनी प्रकाश आमटे** यांना शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०१५ या कै. डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनामध्ये **भारती विद्यापीठाचे कुलपती, मा. डॉ. पतंगरावजी कदम** यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. **सौ. डॉ. मंदाकिनी आमटे** यांना याप्रसंगी रोख रु. ५१,०००/-, छ. महाराणी ताराराणीची प्रतिमा, शाल, श्रीफळ आणि मानपत्र प्रदान करण्यात आले.

## तुकाराम बीज कार्यक्रम

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांची पुण्यतिथी प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही शुक्रवार, दिनांक १३/३/२०१५ या दिवशी साजरी करण्यात आली. समाजप्रबोधनपर अशा या सांस्कृतिक कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून **मा. डॉ. सतिश बडवे** हे उपस्थित होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय **''तुकोबांचे समाज चिंतन''** असा होता.

## कै. सौ. सरोजिनीदेवी तथा काकीजी यांची जयंती

ताराराणी विद्यापीठाच्या प्रेरणा शक्ती व माजी उपाध्यक्षा, पूण्यशील माऊली कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा पूज्य काकीजी यांची १०५ वी जयंती प्रतिवर्षीप्रमाणे मंगळवार, दिनांक २८/०४/२०१५ या दिवशी विविध शाखांमधून साजरी करण्यात आली.

## कमला कॉलेजकरीता पांच क्लासरुमचा विस्तार

ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या विविध कोर्सेसकरीता क्लासरुमची आवश्यकता आहे. त्याकरीता ग्रंथालय इमारतमध्ये दुसऱ्या मजल्यावर नवीन पाच क्लासरुमचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. इमारती बाहेरून पहीला मजला व दुसऱ्या मजल्यावर विद्यार्थिनींना जाणेयेणे करीता आरसीसी

जीन्याचे बांधकाम करण्यात आले. या बांधकामाकरीता जवळजवळ ५६,००,०००/- इतका बांधकाम खर्च आला. तो बांधकाम खर्च हा महाविद्यालयाच्या फंडातून करण्यात आला.

## प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेकरीता सात क्लासरुमचा विस्तार

ताराराणी विद्यापीठाच्या प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेचे सहा वर्ग हे सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ महिला वसतिगृह इमारतीमध्ये भरविले जातात. सदरच्या खोल्या ह्या लहान असल्याने आरटीआय कायद्यानूसार नवीन वर्गखोल्या बांधणे आवश्यक होते.

प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेकरीता बालभवन शेजारी असलेल्या इमारतमध्ये पहिला मजल्यावर ७ क्लासरुमचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या सात क्लासरुमकरीता जवळजवळ रु. ५२,००,०००/- इतका बांधकाम खर्च आला तो बांधकाम खर्च हा संस्थेच्या फंडातून करण्यात आला.

## उषाराजे हायस्कूल क्रीडांगण विकासाकरीता अनुदान

ताराराणी विद्यापीठाच्या उषाराजे हायस्कूल शाखेकरीता क्रीडांगण विकसित करणेकरीता जिल्हा क्रीडाअधिकारी, कोल्हापूर यांचेकडून सात लाख रुपयाचे अनुदान मंजूर झाले आहे. या अनुदानामधील पहिला हप्ता रक्कम रुपये तीन लाख संस्थेकडे जमा झाले आहेत.

या अनुदानातून संस्थेच्या आवारातील डॉ. व्ही. टी. पाटील हॉलशेजारी पार्किंगच्या जागेवर हे क्रीडागंण तयार करण्यात येणार आहे. याकरीता संस्थेने इस्टीमेट तयार करुन ते जवळजवळ १४ लाख रुपये पर्यतचे आहे. त्या इस्टीमेट प्रमाणे निवीदा मागवून हे क्रीडांगण विकासाचे काम सुरु करणेत आलेले आहे. यामध्ये अनुदानापेक्षा जादा येणारा खर्च संस्थेच्या फंडातून करण्यात येणार आहे.

## कंम्पौंड वॉलचे बांधकाम

ताराराणी विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या संरक्षणाच्या दृष्टिने आवारातील कमला कॉलेज कॅन्टीन मागील (पश्चिम बाजू) कंम्पौंड वॉलचा काही भाग पडलेने मागील गेट ते ओढ्यापर्यंतची भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ महिला वसतिगृहामागील कंपौंडची भिंत (पाचव्या गल्लीतील भिंत) कमी उंचीची असल्याने ती वाढवणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे कमला कॉलेज विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या समोर संरक्षणाच्या दृष्टिने पुढे नवीन चेर्लिंग फेसिंग कंपौड बांधणे आवश्यक होते. यासर्व इस्टीमेटला मान्यता देण्यात आली आणि टेंडर काढून सदरच्या भिंतींची बांधकामे सुरु करण्यात आली आहेत.

## प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेकरिता कॉम्प्युटर लॅब

प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेकरिता बालभवन शेजारी असलेल्या इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर ७ क्लासरुमचे बांधकाम पुर्ण करण्यात आले. यापैकी एका क्लासरुममध्ये ताराराणी विद्यापीठतर्फे इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यर्थिनींना संगणकाची ओळख होणेसाठी संगणक प्रशिक्षणासाठी अद्ययावत अशी प्रयोगशाळा सुरु

करण्यात येणार आहे. या कॉम्प्युटर लॅबमध्ये प्राथमिक शाखेतील विविध इयत्तेमधील **६०२** विद्यार्थिनींना प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. त्यामध्ये नवे १२ संगणक, सर्व्हर आणि फर्निचर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

ताराराणी विद्यापीठामध्ये भवानी महोत्सवास निमंत्रित केलेले पाहूणे मा. श्री. रामप्रताप झंवर यांनी या संगणक प्रयोगशाळेकरीता येणारा खर्च देण्याचे मान्य केले असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु झालेली आहे.

## विद्यापीठ अनुदान आयोगाचे आर्थिक सहाय्य

## विशेष उल्लखनीय व्यावसायिक अभ्यासक्रम : बॅचलर ऑफ व्होकेशनल

कमला महाविद्यालयामध्ये बॅचलर ऑफ व्होकेशनल या डिग्री कोर्स अंतर्गत दोन खालील उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

१. बी. व्होक इन रिटेल मॅनेजमेंट ॲड आय. टी.

२. बी. व्होक इन फुड प्रोसेसिंग ॲड मॅनेजमेंट

## यु. जी. सी. कडून कमला कॉलेजकरीता अनुदान

(अ) बॅचलर ऑफ व्होकशनल या डिग्री अभ्यासक्रमा करीता एकूण अनुदान रक्कम रु. १ कोटी ८५ लाख मंजूर झाले आहेत, त्यापैकी रक्कम रु. ६५ लाख प्राप्त झाले आहेत.

(ब) अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष रु. ३ लाख अनुदान प्राप्त झाले आहे.

(क) नॅशनल सेमिनार Gender Discrimination and National Development : Multi Desciplinary साठी एकून रक्कम रु. ८५ हजार अनुदान प्राप्त झाले आहेत.

## स्कॉलरशीप परीक्षेमध्ये मिळालेले उल्लेखनीय यश

१. संस्थेच्या प्रिन्स शिवाजी विद्यालय शाखेच्या विद्यार्थिनींनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थिनी –

   १. कु. देवयानी शिवराज यादव – १७ वा क्रमांक

   २ . कु. समृद्धी शिवाजीराव गुरव – १७ वा क्रमांक

२. संस्थेच्या उषारोजे हायस्कूल शाखेची विद्यार्थिनी कु. हर्षदा नरहरी कुलकर्णी ही माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शहरी विभाग गुणवत्ता यादीत १५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

## रणरागिणी स्पोर्टस क्लब उपक्रम

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही खेळाडू विद्यार्थिनींना तंत्रशुद्ध मार्गदर्शन करणेकरीता विविध खेळांचे प्रशिक्षक नियुक्त केले जातात. याचा लाभ संस्थेच्या कमला कॉलेज, उषाराजे हायस्कूल शाखेतील जवळजवळ ६५ खेळाडू विद्यार्थिनींना होत आहे. यामध्ये हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेस बॉल, कब्बडी, खो–खो, क्रिकेट इ. सांघिक खेळामध्ये व वैयक्तिक खेळात विद्यार्थिनींना जिल्हा पातळीवर, विभागीय पातळीवर व राज्यस्तर पातळीवर यश संपादन केलेल आहे.

## सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

प्रतिवर्षाप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षामध्ये शुक्रवार दिनांक ९/८/१४ या दिवशी रोटरॅक्ट क्लब या संस्थेने सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजने अंतर्गत प्रिन्स शिवाजी विद्यालय या शाखेतील ६० गरीब व होतकरु विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य देऊन मदत केली.

## कार्यकारी अध्यक्ष मा. श्री. रा. कृ. कणबरकर यांचे निधन

ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष मा. श्री. रा. कृ. कणबरकर यांचे दिनांक १३ एप्रिल २०१५ दिवशी दुखःद निधन झाले. मा. कणबरकर यांनी संस्थेमध्ये प्रथम विश्वस्त म्हणून कामकाजास सुरुवात केली. त्यानंतर कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. त्यांच्या शिस्तबद्ध प्रशासनाचा पारदर्शी आर्थिक व्यवहार व नियोजनाच्या तसेच विकासात्मक धोरणामुळे संस्थेच्या वाटचालीला व प्रगतीला निश्चितच महत्त्वपूर्ण योगदान मिळालेले आहे. संस्थेच्या प्रत्येक शाखेच्या अडचणी व दैनंदिन कामकाजावर त्यांचे सतत मार्गदर्शन होत असलेल्या संस्था मोठ्या धडाडीने विकासात्मक वाटचाल करीत आहेत. गेल्या दशकामध्ये संस्थेने भौतिक, गुणात्मक व विस्तारात्मक जी प्रगती केलेली आहे.

यासाठी त्यांचा सक्रीय सहभाग व मार्गदर्शन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. या काळातच ताराराणी विद्यापीठाने संस्थेचा सुवर्णमहोत्सव डॉ. व्ही. टी. पाटील जन्मशताब्दी सोहळा, भारतीय पातळीवर समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात असामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्या, कर्तृत्ववान महिलांना 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार', शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीकरीता 'ताराराणी विद्यापीठ आदर्श शिक्षक पुरस्कार' यासारखे उपक्रम यशस्वीपणे राबवले. या सर्वांची दखल घेऊनच 'रोटरी क्लब, कोल्हापूरने आदर्श शिक्षण संस्था' म्हणून आमच्या ताराराणी विद्यापीठ या संस्थेचा गौरव केला.

मा. कणबरकर यांना ताराराणी विद्यापीठाचे सर्व विश्वस्त, सभासद, पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांचेकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

**मा. रा. कृ. कणबरकर**
कार्यकारी अध्यक्ष
ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर
(१३ एप्रिल २०१५ अखेर)

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
सेक्रेटरी
ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

## ताराराणी विद्यापीठचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

## वार्षिक अहवाल सन २०१४-१५

निर्मांतु शिवं सुंदरम्' हे ब्रीदवाक्य असलेल्या आमच्या महाविद्यालयाने स्वयंपूर्ण, तेजस्वी, पराक्रमी, निर्भयी, साहसी प्रतिताराराणी निर्माण व्हाव्यात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये धेर्य, शौर्य, सृजनशीलता, कार्यनिष्ठता, ध्येयवाद, मानवतावदा या गुणांचा उदय व विकास घडावा या उद्देशाने पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमावर भर दिलेला आहे. ताराराणी विद्यापीठ संस्थेचे शिल्पकार ति. स्व. कै. मा. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी व पुण्यशील काकीजी यांच्या त्यागातून साकारलेल्या ताराराणी विद्यापीठ संस्थेच्या आधारवडाची शाखा 'कमला महाविद्यालय' होय. कोल्हापूर शहरातील एक दर्जेदार शिक्षण देणारे नामांकित महिला महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. विविध क्षेत्रामध्ये आमच्या विद्यार्थीनी तळपत्या तलवारीप्रमाणे चमकाव्यात या दृष्टीने संस्थेचे सचिव व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब यांचे कुशल व खंबीर, दूरदृष्टीसंपन्न नेतृत्त्व सतत प्रयत्नशील आहे.

### प्रमुख घटना- समारंभ- पाहुण्यांची भेट-व्याख्याने - उपक्रम

### * कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची पुण्यतिथी

ताराराणी विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा, स्फूर्तीदेवता, पुण्यशील माऊली कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा पूज्य काकीजी यांच्या ४५ व्या पुण्यतिथी निमित्त ज्येष्ठ विचारवंत मा. श्री. कॉम्रेड गोंविदराव पानसरे यांचे 'राजर्षि शाहू महाराज यांचे महिला शिक्षण विषयक धोरण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले व त्यांच्या हस्ते उषाराजे हायस्कूल मधील गरीब होतकरू विद्यार्थिनींना गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

### कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा परमपूज्य काकाजी यांची ११४ वी जयंती

करवीर नगरीचे भूषण स्त्री शिक्षणाचे महान पुरस्कर्ते ताराराणी विद्यापीठ संस्थेचे संस्थापक- अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा परमपूज्य काकाजींच्या ११४ व्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले. तसेच वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

### * थोर विभूतींचे पुण्यस्मरण

करवीर भूषण श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, महाराणी ताराबाई, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रिबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या थोर सामाजिक विभूतींच्या जयंती, पुण्यतिथी निमित्त मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

***स्वातंत्र्यदिन**

शुक्रवार दि. १५ ऑगस्ट, २०१४ या दिवशी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष मा. श्री. रा. कृ. कणबरकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

*** घटस्थापना**

दि. २५ सप्टेंबर, २०१४ या दिवशी भवानी महोत्सवा निमित्त श्री. ए. आर. पर्वते व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या शुभहस्ते घटस्थापना सोहळा संपन्न झाला.

*** मातृदिन**

भवानी महोत्सवामध्ये हळदी-कुंकू समारंभ संपन्न झाला. महावद्यिायलाच्यावतीने प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी काम पाहिले. तसेच विद्यार्थिनी प्रतिनीधीमंडळातील विद्यार्थिनींचा ही मोलाचा सहभाग होता.

*** कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा प. पू. काकाजी यांचा स्मृतिदिन**

ताराराणी विद्यापीठ संस्थेचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा २० वा स्मृतिदिन दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झाला.

*** डॉ. सौ. मंदाकिनी प्रकाश आमटे- भद्रकाली ताराराणी पुरस्कार सोहळा**

कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या २० व्या स्मृतिदिना प्रसंगी हेमलकसाची कर्तृत्वशाली रणरागिणी मा. डॉ. सौ. मंदाकिनी प्रकाश आमटे यांना भद्रकाली ताराणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. भामरागडच्या आदिवासी समाजासाठी त्यांनी आपले समस्त आयुष्य समर्पित केले. व डॉ. बाबा आमटेंच्या सामाजिक कार्याचा वसा निरंतर चालू ठेवला. महाराष्ट्र राज्याचे माजी वनमंत्री मा. डॉ. पतंगरावजी कमद यांच्या हस्ते महाराणी ताराराणीचे प्रतिकृतीस्वरूप स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, गौरवपत्र व रोख रक्कम रू. ५१,०००/- अशा स्वरूपात भद्रकाली ताराराणी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

**विशेष उल्लेखनीय व्यावसायिक अभ्यासक्रम - बॅचलर ऑफ व्होकेशन**

बॅचलर ऑफ व्होकेशन या कौशल्य विकासवर आधारित दोन अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून सोय उपलब्ध झालेली आहे.

**१) बी. व्होक इन रिटेल मॅनेजमेंट ॲण्ड आय. टी**

**२) बी. व्होक इन फूड प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेंट**

▶ कोणत्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थिनी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात.

▶ हे पदवी अभ्यासक्रम असलेले शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील एकमेव महाविद्यालय आहे

▶ तसेच UGC च्या मान्यतेनुसार करियर ओरिएंडेड कोर्स अंतर्गत

१) बेसिक कॉम्प्युटर ॲण्ड इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी

२) हॉस्पिटल ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट

३) योगा ॲण्ड हेल्थ एज्युकेशन

४) डायटेटिक्स ॲण्ड हेल्थ एज्युकेशन

५) ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी

६) कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश

कोर्सेस सुरु आहेत. तसेच एरोबिक्स व ज्यूदो कराटेचे अल्प मुदतीचे कोर्सेस सुरू आहेत.

## महाविद्यालयीन शैक्षणिक प्रगतीचा संख्यात्मक व गुणात्मक विकास

सन २०१३–१४ या शैक्षणिक वर्षामध्ये कनिष्ठ विभागात कला, वाणिज्य आणि विज्ञान या तीन विद्याशाखांतर्गत १२४२ विद्यार्थिनी; वरिष्ठ विभाग कला, वाणिज्य, बी. सी. ए., बी. व्होक, एम. ए. होमसायन्स, एम. ए. इंग्लिश, योगा थेरपी, पी. जी. डिप्लोमा मिळून २३३६ विद्यार्थिनी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. गुणवत्तापूर्ण अभ्यासकेंद्र अशी ओळख असणाऱ्या आमच्या महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रमध्ये २८९ विद्यार्थिनी पदवी व पदव्युत्तर स्तरावर करीत आहेत. सन २०१४ –१५ या शैक्षणिक वर्षापासून सदर केंद्राच्या वतीने एम.ए. मराठी विषयाबरोबर एम. ए. हिंदी विषय पदव्युत्त स्तरावर सुरू करण्यात आलेला आहे.

* पदवीस्तरावर कला शाखेसाठी (१) समाजशास्त्र (२) अर्थशास्त्र (३) होमसायन्स (४) इंग्रजी (५) हिंदी या विषयांचे स्पेशल विषय म्हणून अध्यापन केले जाते.
* वाणिज्य शाखेसाठी (१) Advanced Accounting (२) Industrial Management हे विषय विशेष स्तरावर B.Com. Part - III साठी शिकविले जातात.
* Innovative programme अंतर्गत U.G.C. च्या मान्यतेने P. G. Diploma in Yoga Theraphy हा एक वर्ष कालावधीचा डिप्लोमा अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे.
* अनुसुचित जाती जमातीतील विद्यार्थिनीसाठी एन्ट्री एन सर्व्हिसेस स्किम अंतर्गत स्पर्धात्मक परीक्षांच्या स्वतंत्र मार्गदर्शनाची सोय.
* रेमिडिअल कोचिंग स्पर्धात्मक परीक्षांच्या स्वतंत्र मार्गदर्शनाची सोय.
* रेमिडिअल कोचिंग स्किम अंतर्गत एस. सी., एस. टी. विद्यार्थिनीसाठी अभ्यास विषयाचे स्वतंत्र मार्गदर्शन.
* (१) एम. ए.– इंग्रजी, (२) एम. ए. – योगशास्त्र सर्टिफीकेट कोर्स इन कॉम्प्युटराईजड अकौंटींग (करीअर ओरीएंटेड प्रोग्रॅम)
* कनिष्ठ महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान व गणित विषय शिकविण्याची सोय आहे.

## भौतिक सुविधा

महाविद्यालयाची मुख्य इमारत तीन मजली असून विस्तारीत तीन मजली इमारतीमध्ये श्रीमती शकुंतला घाटगे अभ्यासिका, ग्रंथालय, कॉम्प्युटर लॅब, सायन्स लॅब्स, रिटेल मॅनेजमेंट अॅन्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व फूड प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेंट या बॅचलर ऑफ व्होकेशनल पदवी अभ्यासक्रमांच्यासाठी स्वतंत्र लॅब, सेमिनार हॉल

असून नवीन पाच वर्ग खोल्यांचे बांधकाम या अहवाल साली पूर्ण करण्यात आले. उपाहार गृह, कमला हेल्थ व योगा हॉलच्या स्वतंत्र इमारती असून खेळाची विविध मैदाने आहेत.

## विविध स्तरावरील गुणात्मक विकास व उज्जल निकाल परंपरा : सन २०१३–१४

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बारावी कला – ९६.९६% | बारावी वाणिज्य – ९५.९१% | बारावी विज्ञान – ८९.३७% |
| २. | प्रथम वर्ष कला – – | द्वितीय वर्ष वाणिज्य – ९५% | तृतीय वर्ष वाणिज्य – ९७% |
| ३. | प्रथम वर्ष वाणिज्य – – | द्वितीय वर्ष कला – ८५% | तृतीय वर्ष कला – ८३% |
| ४. | प्रथम वर्ष बी.सी.ए. भाग – | द्वितीय वर्ष बी. सी. ए. – ९९% | तृतीय वर्ष बी. सी. ए. – १००% |

प्रथम वर्ष एम. ए. होमसायन्स – ७५%

द्वितीय एम. ए. होमसायन्स – ८०%

प्रथम वर्ष एम. ए. इंग्लिश – ७१%

पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी – ९३%

एम. ए. योगशास्त्र – ९३%

## विशेष श्रेणी प्राप्त व प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी

| | | | |
|---|---|---|---|
| पी. जी. डिप्लोमा इन योगा थेरपी | | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०३ |
| बी. सी. ए. भाग –३ | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | १२ |
| कला विभाग–३ | इंग्रजी – | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | १० |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०९ |
| | हिंदी – | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०५ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०६ |
| | समाजशास्त्र – | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०३ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | १६ |
| | अर्थशास्त्र – | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०२ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ११ |
| | गृहशास्त्र – | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०२ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| वाणिज्य भाग -३ | अकौंटिग - | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०८ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ३७ |
| | आय. एम (इंडस्ट्रियल मॅनेजमेंट)- | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०२ |
| | | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | १६ |
| एम. ए. भाग-१ | इंग्रजी- | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०१ |
| एम. ए. भाग-१ | योगशास्त्र - | विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०३ |
| | | प्रथम श्रेणीप्राप्त विद्यार्थिनी | १० |
| एम. ए. भाग-१ | गृहशास्त्र - | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०३ |
| एम. ए. भाग-२ | गृहशास्त्र - | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थिनी | ०१ |

**एम. ए. भाग-२ मध्ये गृहशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम कु. पाटील नेहा हनुमंत**

*** विशेष उल्लेखनीय**

बी. ए. भाग-३ गृहशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम कु. आल्फिया पेंढारी आली असून ती बापूजी साळुंखे स्मृती पारितोषिकाची मानकरी ठरली आहे.

*** विशेष शिष्यवृत्तीच्या मानकरी, यशस्वी विद्यार्थिनी**

- कै. सुलेखा बागल शिष्यवृत्ती या वर्षी कु. कापले ज्योती भीमराव -( बी. ए. भाग-१) कु. दांगट भारती गणपती (बी. ए. भाग-१), कु. खोत जयश्री शहाजी (बी. कॉम-भाग-१), कु. भोसले सोनाली नारायण (बी. कॉम- भाग-१), या विद्यार्थिनीला प्राप्त झाली.
- सौ. मंगल मल्लिकार्जुन कोरी शिष्यवृत्ती या वर्षी वरिष्ठ विभागातील कु. पाटील तेजस्विनी माणिक, कु. दांगट भारती गणपती, कु. लोंढे रोहिणी भीमराव, कु. मते प्रिया मनोहर, कु. नेर्लेकर सोनाली अण्णासो यांना प्राप्त झाली.
- कनिष्ठ विभागातील कु. पाटील प्रियांका महादेव, कु. शिरगावे सुरेखा राजाराम, कु. नलवडे सृष्टी जितेंद्र, कु. पुजारी सिद्धीका मारुती, कु कुरणे प्रियांका पंडित या विद्यार्थिनींना सदरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

**यु.जी.सी. अनुदान २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात यु.जी.सी. कडून महाविद्यालयाला खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले.**

१. बॅचलर ऑफ व्होकेशन एकूण अनुदान रु. १ कोटी ८५ लाख मंजूर झाले आहेत. त्यापैकी ६५ लाख प्राप्त झाले आहेत.

२. अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष रु. ३ लाख अनुदान प्राप्त.

३. नॅशनल सेमिनार "Gender Discrimination and Nationall and National Devlopment : Multi Disciplinary " साठी एकूण रु. ८५ हजार अनुदान प्राप्त.

## क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य (सांघिक व वैयक्तिक)

आमच्या महाविद्यालयाच्या फुटबॉल संघाने जिल्हा–स्तरावर प्रथम क्रमांक व विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. योगामध्ये कु. सृष्टी नलवडे ने चतुर्थ क्रमांक मिळविला व कु. गीता पोवार ने सिकई मार्शल आर्टमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला.

ॲथेलटिक्समध्ये फोर बाय इंड्रेड (४ × १००) रिले रेसमध्ये जिल्हास्तरावर कु. सोनाली देसाई, कु. प्राजक्ता आळवेकर, कु. यास्मिन मुल्ला, कु. आरती जाधव, कु. पूजा परीट यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. लांब उडीमध्ये कु. प्राजक्ता आळवेकर ने प्रथम क्रमांक व कु. आरती जाधव ने द्वितीय क्रमांक व भालाफेक मध्ये कु. वैशाली जरग ने द्वितीय क्रमांक मिळविला.

कनिष्ठ विभागाच्या संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत सॉफ्टबॉल व बेसबॉल मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. राज्यस्तरीय रोप मल्लखांब स्पर्धेत कु. सृष्टी नलवडेने राष्ट्रीय स्पर्धेत गोल्ड मेडल मिळविले.

## राष्ट्रीय सेवा योजना – (एन.एस.एस.)

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत सामाजिक बांधिलकी व श्रमाची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य केले जाते. या योजनेत २०० विद्यार्थिनी व दोन कार्यक्रम अधिकारी आणि तीन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कार्यरत आहेत. अहवालासाली दत्तक खेडे मौजे राक्षी ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. ह्या अंतर्गत विद्यार्थिनींनी श्रमदानाचे विविध उपक्रम व प्रबोधनात्मक उपक्रम, स्वच्छता मोहिम, समाजप्रबोधनपर व्याख्याने अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्यक्रम पार पाडले.

## राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.)

कमला महाविद्यालयाच्या छात्र सेनेच्या 'सी' प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १००% लागला. राष्ट्रीय स्तरावरील विविध कॅम्प मधील आमच्या कॅडेटस्नी सहभाग घेतला.

**दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या राजपथावरील सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कॅडेट कु. प्रणाली शेंडगे हिची निवड झाली.**

National Intergration Camp, Mumbai येथील कॅम्पमध्ये सहभागी पाच कॅडेटसना प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

I.G.C , R. D. C. औरंगाबाद येथील कॅम्पचे कॅप्टन वर्षा साठेनी नेतृत्व केले होते व या विभागास प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

## फोरम ऑफ फ्री एंटर प्राईजेस वक्तृत्व स्पर्धा

विद्यार्थिनींच्या सामाजिक जाणीवा प्रगल्भ होण्यासाठी, देशापुढील ज्वलंत समस्या विद्यार्थिनींना समजाव्यात यासाठी फोरम ऑफ फ्री एंटरप्राईजेस मुंबई यांच्यावतीने महाविद्यालयात दरवर्षी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकास **अनुक्रमे रु. १२५०/–, रु. १०००/–, रु. ७५०/–** तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक दिली गेली.

## विद्यार्थी कल्याण निधी

अहवाल साली कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील होतकरु, गरीब अशा एकूण ५८ विद्यार्थिनींना २९,०००/- रु. इतके आर्थिक सहाय्य देण्यात आले.

## ग्रंथालय अहवाल

ग्रंथालयाची आज अखेर ग्रंथसंख्या ५२७७१ इतकी असून या ग्रंथसंग्रहाची एकूण किंमत रुपये ४१,७२,९३७/- इतकी आहे. सिनिअर कॉलेजच्या एकूण ५५ विद्यार्थिनींना पुस्तक संच बुक बँक योजनेतून देण्यात आले. तसेच ग्रंथालयामार्फत ग्रंथप्रदर्शन कार्यशाळा इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष

महाविद्यालयाची गुणवत्ता वृद्धिंगत व्हावी व ती अधिक बळकट व्हावी यासाठी महाविद्यालयामध्ये (Internal Quality Assurance Cell) असून हा Cell महाविद्यालयासाठी Action Plan तयार करतो. त्या अंतर्गत विविध कार्यशाळा, परिषदा व चर्चासत्रे, कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन सदर हमीकक्षाच्या सूचनेनुसार करण्यात येते.

## कमला नियतकालिकाचे यश

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या 'कमला' या वार्षिक नियतकालिकाने आपली यशाची परंपरा कायम राखून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन नियताकालिक स्पर्धेत लेखन विभागातील तीन बक्षिसे प्राप्त केली आहे.

१) कु. स्नेहल सुनील बोरे हिच्या **'फिल्ड मार्शल-माणकेशा'** या व्यक्तिचित्रणास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.

२) कु. तनुजा लोहार हिच्या "The indispensable Language English' या वैचारिक लेखास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.

३) कु. स्नेहल विष्णू माने हिच्या **'वर्तमान शिक्षण पद्धती'** या वैचारिक लेखास **तृतीय क्रमांकाचे** बक्षीस प्राप्त.

## वार्षिक दिन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

अहवालसाली वार्षिक दिनाचे दि. ०२ फेब्रुवारी २०१५ रोजी आयोजन करण्यात आले. दि. २ फेब्रुवारी २०१५ रोजी फुड फेस्टिवल, फनी गेम्स आणि अल्पोपहाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तर दि. ०३ फेब्रुवारी २०१५ रोजी 'विविध गुणदर्शनाचा' कार्यक्रम संपन्न झाला. वार्षिक दिना निमित्त वक्तृत्व, रांगोळी, निबंध लेखन, मेंहदी, कुकरी, चौपाटी पदार्थ, पाककृती इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. २०/२/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी श्री. राजाराम माने यांच्या शुभहस्ते वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

## महाविद्यालयामध्ये कार्यरत विविध मंडळे

विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाबरोबर त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडावा या उद्देशाने महाविद्यालयात एकूण ४९ विविध मंडळे व समित्या कार्यरत असून त्यामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विविध उपक्रम

राबविले जातात. परीक्षा विभाग, विद्यार्थिनी प्रतिनिधी मंडळ, करिअर मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष, मेंटॉरींग सेल, समान संधी केंद्र, मराठी वाङ्मय मंडळ, वक्तृत्त्व व वादविवाद मंडळ, हिंदी साहित्य मंडळ, इंग्लिश फोरम, विविध कलागुण विकास मंडळ, विद्यार्थिनी कल्याण निधी विभाग, निसर्ग मंडळ, आर्टसर्कल, भित्तीपत्रक समिती, सामाजिकशास्त्र मंडळ, कॉमर्स फोरम, साक्षरता अभियान समिती, प्राध्यापक प्रबोधिनी समिती, विवेक वाहिनी व अंधश्रद्धा निर्मुलन समिती, योगा व स्वास्थ्य जागृती मंडळ, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती, मानसशास्त्रीय सल्ला मार्गदर्शन समिती, शिक्षक पालक संघ, माजी विद्यार्थिनी संघ, सहल विभाग, लोकसंख्या शिक्षण मंडळ इ. मंडळामार्फत अहवालसाली विविध उपक्रम राबविण्यात आले.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पदवी अभ्यास केंद्र**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक कार्यक्षेत्रातील एकमेव असे महिला व मुलींसाठीचे पदवी अभ्यासकेंद्र आमच्या महाविद्यालयात कार्यरत आहे. सदर अभ्यास केंद्रात 'पूर्व तयारी वर्ग' बी.ए., बी.कॉम. पदवी आणि एम. ए. (मराठी) अशा विविध वर्गात महिला व मुली शिक्षण घेत आहे. तसेच एम. ए (हिंदी) या अभ्यासक्रमास मंजूरी मिळाली असून सदर पदव्यूत्तर अभ्यासक्रम यावर्षी सुरू होत आहे.

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
प्राचार्य
कमला महाविद्यालय, कोल्हापूर.

## ताराराणी विद्यापीठाचे

# ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजारामपुरी, कोल्हापूर.

## वार्षिक अहवाल सन २०१४-१५

ताराराणी विद्यापीठाचे, संस्थापक व अध्यक्ष पूजनीय कै. डॉ. व्ही.टी.पाटील तथा काकाजी यांनी स्त्री शिक्षणाची गरज लक्षात घेऊन सन १९५१ मध्ये 'ताराराणी अध्यापक विद्यालय' या नावाने शाखा सुरू केली. पूर्वी या अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षकांसाठी शिक्षण ज्युनि. खात्याचा पी.टी.सी. हा अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला जात असे. जून, १९६८ पासून एस. एस. सी पास मूलींसाठी 'डिप्लोमा इन एज्युकेशन' हा कोर्स सुरू करण्यात आला. सन १९९३ पासून एच. एस. सी. पास विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर ''डी. एड्. अभ्यासक्रमासाठी'' प्रवेश दिला जाऊ लागला. सन २००४ पासून डिप्लोमा इन टिचर एज्युकेशन (डी.टी. एड) या नांवाने हा अभ्यासक्रम पूर्ण करुन घेतला जात आहे.

### शाखेचा विस्तार व विद्यार्थीनी संख्या

चालू शैक्षणिक वर्षाचे कामकाज १५ जून, २०१४ पासून सुरू झाले. प्रथम वर्षात २५ विद्यार्थिनी व द्वितीय वर्षात २३ विद्यार्थीनी शिकत होत्या.

सर्व सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षणार्थींना अध्यापन करण्यासाठी प्राचार्यांसह सात विनित पदव्युत्तर प्रशिक्षित अध्यापक आहेत. सर्व शिक्षकांनी एन.सी.टी.ई. निकषाप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली आहे.

### शाखेतील प्रमुख घटना व उपक्रम :

केवळ बौद्धिक वैयक्तिक क्षमतांच्या विकासाकडे लक्ष दिले जात असे नाही तर आमच्या अध्यापक विद्यालयातून दर्जेदार शिक्षक निर्मितीसाठी खालील अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन केले होते.

१. **भवानी महोत्सव :** भवानी महोत्सवामध्ये संस्कृती संक्रमण व संवर्धनासाठी धार्मिक कार्यक्रमाबरोबर गरबा नृत्याचे विद्यार्थीनीनी सादरीकरण केले.

२. **नागपंचमी :** नागपंचमीच्या दिवशी विद्यार्थीनींनी झीम्मा-फुगडी व लोकगीत सादर केली.

३. **स्वच्छता अभियान :** गांधीजंयती दिवशी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

४. **समाजसेवा शिबिर :** प्रथम वर्षाला समाजसेवा शिबिरात विविध विषयातील तज्ञांची व्याख्याने, सर्वे क्षण, क्षेत्रभेट असे उपक्रम घेण्यात आले.

५. **बौद्धिक व सांस्कृतिक स्पर्धा :** बौद्धिक स्पर्धामध्ये मराठी व हिंदी निबंध लेखन, वक्तृत्व, एकपात्री अभिनय, प्रश्नमंजुषा, स्मरण चाचणी, मराठी हस्ताक्षर तर सांस्कृतिक स्पर्धामध्ये भावगीत व समुहगीत

या स्पर्धा घेऊन अभ्यासपूरक उपक्रमांना चालना देण्यासाठी सर्व विद्यार्थीनींनी उस्फुर्त सहभागाने प्रतिसाद नोंदविला.

६. **क्रीडा स्पर्धा :** क्रीडा स्पर्धेमध्ये कब्बडी ही सांधिक स्पर्धा तर १०० व २०० मीटरधावणे, गोळाफेक, थाळीफेक स्पर्धा, भालाफेक या वैयक्तिक क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या.

७. **भितीपत्रिका व हस्तलिखित :** यावर्षी भित्तीपत्रिकामधुन काच फलकात विविध साहित्य प्रदर्शित करुन अवांतर वाचनास संधी उपलब्ध करुन दिली. कॉलेजच्या हस्तलिखित विभागाने ''रणरागिणी'' या नावाचे हस्तलिखित प्रकाशित केले आहे.

८. **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :** अरुण नरके फाऊंडेशनच्यावतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गणित विषयासाठी जलद गतीने गणित सोडविण्याच्या क्लुप्त्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

९. **कार्यशाळा :** I Creat India & Network for teaching entrepreneurship Newyork यांच्यावतीने मुंबई येथील ''सफर'' या संस्थेमार्फत Aspring enterpreneurship workshop कॉलेजमध्ये आयोजीत केले होते. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थीनी अतिशय उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. सफर संस्थेमार्फत विद्यार्थीनींना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देणेत आली.

१०. **वाचन स्पर्धा :** नरेंद्र दाभोळकर अंधश्रद्धा समितीमार्फत वाचन स्पर्धा घेण्यात आली. यशस्वी विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रे देण्यात आली.

## सांस्कृतिक कार्यक्रम

या शैक्षणिक वर्षामध्ये आमच्या कॉलेजच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये छ. शाहू महाराज जयंती, गुरूपौर्णिमा, जागतिक लोकसंख्यादिन, ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व अध्यक्ष कै. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची जयंती, कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजींची पुण्यतिथी, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती, क्रांतीदिन, स्वातंत्र्यदिन, शिक्षक दिन, हिंदी दिन, महात्मा गांधी जयंती, लालबहादुर शास्त्री जयंती, प्रथम वर्ष स्वागत समारंभ, बालदिन, म. फुले स्मृतिदीन, एडस् निर्मूलन दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, ध्वजदिन, महाराणी ताराराणी पुण्यतिथी, संविधानदिन, सावित्रीबाई फुले जयंती, भूगोलदिन, कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा स्मृर्तीदिन. बालिकादिन, प्रजासत्ताक दिन, छ. शिवाजी महाराज जयंती, मराठी राजभाषा दिन, राष्ट्रीय विज्ञान दिन, जागतिक माहिला दिन, आरोग्य दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, वसुंधरा दिन, तुकाराम बीज, कै. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची जयंती इ. सांस्कृतिक कार्यक्रम व विशेष दिन साजरे करण्यात आले.

**परीक्षा निकाल**

यावर्षी आमच्या कॉलेजचा निकाल द्वितीय वर्ष ८७.०० टक्के व प्रथम वर्ष ८२.१४ टक्के लागला.

**जिल्हास्तरीय अध्यापक विद्यालय स्पर्धा**

जिल्हास्तरीय अध्यापक विद्यालयाअंतर्गत झालेल्या बौधिक व सांस्कृतिक स्पर्धामध्ये आमच्या विद्यार्थीनींनी यश संपादन केले.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न मंजुषा | – | प्रथम क्रमांक, |
| एकपात्री अभिनय | – | प्रथम क्रमांक |
| निबंध लेखन | – | तृतीय क्रमांक |
| भावगीत गायन | – | तृतीय क्रमांक |

**एन. सी. सी.विभाग**

यावर्षी आमच्या कॉलेजच्या ७ एन. सी. सी. कॅडेटसनी 'सी' सर्टिफिकेट प्राप्त केले तर ३ एन. सी. सी. कॅडेटसनी 'बी' सर्टिफिकेट प्राप्त केले असून त्या नागपूर येथील नॅशनल इंटीग्रेशन कॅम्पमध्ये सहभागी झाल्या होत्या.

अशा प्रकारे कै. व्ही. टी. पाटील तथा काकाजी आणि कै. काकीजी तथा सौ. सरोजिनीदेवी व्ही. पाटील यांच्या आशीर्वादाने आणि संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष मा. रा. कृ. कणबरकरसाहेब तसेच सेक्रटरी व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटीलसाहेब यांच्या मार्गदर्शनामुळे आमचे डी.टी.एड कॉलेज प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

**डॉ. सौ. स्वामी व्ही. ए.**
प्राचार्या
ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्यूकेशन, डी.टी.ई.
राजारामपुरी, कोल्हापूर.

## ताराराणी विद्यापीठाचे

# उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर

## वार्षिक अहवाल सन २०१४-१५

हिंदवी स्वराज्याच्या पडत्या काळात स्वराज्याची कोलमडून पडलेली दौलत सावरण्यासाठी महाराष्ट्राच्या निराश मनाला धीर देण्यासाठज्ञ निष्प्राण देशात प्राण ओतण्यासाठी महाराष्ट्रात एक असामान्य स्त्री पुढे आली, ती स्त्री होती शिवस्नुषा 'महाराणी ताराराणी'.

अशा असामान्य कर्तृत्ववान स्त्रीचे आधुनिक महाराष्ट्राला सतत स्मरण व्हावे म्हणून आणि स्त्री हीच समाजाची प्रेरक व तारक शक्ती असते हे जाणून केवळ स्त्री शिक्षणासाठी वाहून घेतलेल्या द्रष्ट्या काकाजींनी १९४५ साली केवळ २२ मुलींनिशी 'तााराणी विद्यामंदिर' सुरु करुन ताराराणी विद्यापीठाची मुहुर्त मेढ रोवली. ही संस्था आज एक महान वटवृक्ष होवून उभी आहे. या भव्य वटवृक्षरुपी विद्यापीठाच्या अनेक शाखांपैकी एक शाखा म्हणजे बहुउद्देशीय उषाराजे हायस्कूल.

कोल्हापूरातील नामांकित शाळांपैकी एक शाळा असलेल्या उषाराजे हायस्कूलमध्ये आज इयत्ता ५ वी ते १० वी अखेर ३६ तुकड्या असून एकूण सुमारे २२६६ विद्यार्थिंनी येथे शिक्षण घेत आहेत.

अशा या वैशिष्ट्येपूर्ण असणाऱ्या उषाराजे हायस्कूलमध्ये गृहशास्त्र, संगणक, गायन, वादन, चित्रकला, शिवणकाम, भरतकाम, विणकाम, संगीत, कार्यानुभव, खेळ, एन.सी.सी., एम.सी.सी., आर.एस.पी., गर्लगाईड, बागकाम, मूल्यशिक्षण, पर्यावरण, जनरल नॉलेज इ. विविध विषयांचे शिक्षण दिले जाते.

### एस.एस.सी. निकाल

उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींच्याकडे केवळ संख्यात्मक वाढीकडेच नाही तर त्यांच्या गुणात्मक वाढीकडेही अधिक लक्ष दिले जाते.

मार्च २०१५ मध्ये एस.एस.सी. परीक्षेसाठी एकूण ४६० विद्यार्थिनी बसल्या होत्या. त्यापैकी ४५५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या.

शाळेचा निकाल ९८.९१% लागला. शाळेमध्ये ९०% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या एकूण ६१ विद्यार्थिनी आहेत. तसेच ९५% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या एकूण १५ विद्यार्थिनी आहेत. शाळेत प्रथम क्रमांक कु. साळुंखे निहारिका अमित ५०० पैकी ४९२ गुण ९८.४०% , द्वितीय क्रमांक कु. भवार प्रतिक्षा गोपाळ ५०० पैकी ९७.४०% गुण, तृतीय क्रमांक विभागून कु. लोखंडे वृषाली भिवाजी व कु. पाटील आश्विनी आनंदा ५०० पैकी ४८६ गुण ९७.२०%.

याचप्रमाणे विविध विषयात पैकींच्या पैकी गुण मिळवलेल्या विद्यार्थिनींची संख्या खालीलप्रमाणे –

संस्कृत १०, गणित ४, समाजशास्त्र ४.

तसेच मागासवर्गीयात शाळेत प्रथम कु. लोखंडे वृषाली भिवाजी गुण ४८६/५०० (९७.२०%).

अशा प्रकारे विद्यार्थिनींनी भरघोस सुयश मिळविले.

## इ. १० वी स्कॉलर बॅच

उषाराजे हायस्कूलमध्ये १० वी स्कॉलरबॅचचे आयोजन केले जाते. इ. १० वीच्या ४४ विद्यार्थिनी स्कॉलर बॅचसाठी निवडण्यात आल्या. दिवाळीच्या सुट्टीत जादा तासांचे नियोजन करून ३० नोव्हेंबरलाच अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. त्यांना तज्ज्ञ शिक्षकांकडून वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले. वारंवार सराव परीक्षा घेऊन सर्व विषयांचे पेपर्स सोडवून घेऊन ते इतर शाळांमधील तज्ज्ञ विषय शिक्षकांकडून तपासून घेण्यात आले. याचा विद्यार्थिनींना खूपच उपयोग झाला. यामधील एकूण १५ विद्यार्थीनींना ९५% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले व ४३ मूलींना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले. स्कॉलर बॅचप्रमुख श्री. एस. पी. वातकर व उपप्रमुख सौ. पी. एस. पवार यानी उत्तम तऱ्हेने काम पार पाडले.

## माध्यमिक शिष्यवृत्ती निकाल

सन २०१४–२०१५ मध्ये झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस एकूण ४२ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. कु. हर्षदा नरहरी कुलकर्णी शहरी विभागात १५ वी आली.

अशाप्रकारे माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थिनींनी सुयश मिळविले.

## यावर्षीचे उपक्रम

शैक्षणिक वर्ष १५ जून २०१५ पासून सुरू झाले. उषाराजे हायस्कूल ही एक बहुउद्देशीय शाळा असल्याने विद्यार्थिनींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संपूर्ण वर्षभरातच विविध उपक्रम हाती घेतले जातात. जूनमध्ये अतिशय उत्साहात शाळेचे नववर्ष सुरू झाले. इ. ५ वी ते ८ वी मध्ये नवीन मुलींचे प्रवेश सुरू झाले.

जून २०१५ मध्ये इ. ५ वी ते १० वी च्या सर्वच मुलींच्या पालकांसाठी शालेय शिस्त नियोजन, उपक्रम यांची माहिती देण्यासाठी मेळावा संपन्न झाला. पालकांनी सतत शाळेच्या संपर्कात रहावे असे अवाहन केले.

नवीन मुलींच्या पालकांसाठी शालेय शिस्त, नियोजन, उपक्रम यांची माहिती देण्यासाठी मेळावा संपन्न झाला. पालकांनी सतत शाळेच्या संपर्कात रहावे असे आवाहन केले.

थोरामोठ्यांची जयंती–पुण्यतिथी साजरी करून त्यांच्या कार्याचा आदर्श मुलींपुढे ठेवला जातो. छत्रपती शाहू महाराज जयंती, महाकवी कालीदास दिन, छ. राजाराम महाराज जयंती, लो. टिळक पुण्यतिथी, हिरोशिमा दिन, क्रांतीदिन, हिंदी दिन, स्वामी विवेकानंद व वैज्ञानिक मेरी क्युरी यांची पुण्यतिथी, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिन शिक्षकदिन, जागतिक लोकसंख्या दिन, म. गांधी जयंती व लालबहाद्दूर शास्त्री जयंती, पं. जवाहरलाल नेहरू जन्मदिन, करवीर संस्थापिका छ. महाराणी ताराराणी पुण्यतिथी, म. फुले यांची ११९ वी पुण्यतिथी, जागतिक एडस् दिन, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ५२ वा महानिर्वाणदिन, सावित्रिबाई फुले जयंती बालिका दिन, नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती, छ. शिवाजी महाराज जयंती, म. फुले जन्मदिन, बेड्न पॉवेल दिन, तुकाराम बीज, जागतिक महिला दिन याप्रसंगी विविध कार्यक्रम संपन्न झाले.

दि. १८/७/१४ रोजी ताराराणी विद्यापीठाच्या उपाध्यक्षा कै. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा काकीजी यांची ४५ वी पुण्यातिथी साजरी करण्यात आली.

दि. १/८/१४ रोजी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांची ११४ वी जयंती साजरी करणेत आली.

प्रतिवर्षाप्रमाणे घटस्थापना, मूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रम ताराराणी विद्यापीठ संस्थेचे विश्वस्त मा. श्री. अशोकराव आर. पर्वते व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अलका पर्वते यांच्या शुभहस्ते झाले. विज्ञान प्रदर्शन व मातृदिन साजरा झाला. यावेळी रांगोळी, कार्यानुभव, विज्ञान व व्यवसाय मार्गदर्शन इ. ची. प्रदर्शने मांडण्यात आली. विद्यार्थिनी दिनही याच दिवशी साजरा झाला. खंडेनवमी दिवशी घट हलवून महोत्सवाची सांगता झाली.

दि. १३/१२/१४ रोजी शालेय पारितोषिक वितरण कार्यक्रम मा. प्रशांत पाटील, प्रांताधिकारी, करवीर यांचे शुभहस्ते संपन्न झाला. दि. १७/९/१५ रोजी ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांचा २० वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

दि. १५/१२/१४ रोजी देणगीदार पारितोषिक वितरण समारंभ मा. डॉ. भालबा विभूते, विभागीय संचालक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे शुभहस्ते करणेत आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री. डॉ. क्रांतीकुमार पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते. कै. सौ. सरोजिनीदेवी पाटील तथा काकीजी यांची जयंती समारंभ संपन्न झाला. दि. १ मे २०१५ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करणेत आला.

## स्नेहसंमेलन

दि. २२/१२/२०१४ रोजी द्वैवार्षिक स्नेहसंमेलन डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन येथे संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन मा. सौ. कांचनताई क्रांतिकुमार पाटील यांचे शुभहस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे सचिव व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. क्रांतिकुमार पाटील साहेब, संस्थेच्या विश्वस्त मा. श्रीमती व्ही. पी. निकम पाटील मॅडम, सर्व शाखांचे प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## संचयिका

शाळेतील विद्यार्थिनींना बचत करता यावी यासाठी संचालिका विभाग सुरु आहे. बुधवारी व शुक्रवारी संचयिकेचे कामकाज या दोन दिवशी सुरु असते. ५ वी व ८ वीच्या नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिंनीना पासबुक व नंबर देवून एकूण १७० नवीन खाती सुरू केली. मुदतबंद खातेवरील शिल्लक २२७९७/- आहे. अशाप्रकारे संचयिकेचे कामकाज उत्तम चालते.

## बाह्य परीक्षा

प्रथम सत्रात गणित व हिंदी या विषयांच्या बाह्य परीक्षा झाल्या.

१. गणित बाह्य परीक्षा पहिलीमध्ये ६६ पैकी ६० पास (९१%) व दुसरीमध्ये एकूण ७९ पैकी ६५ पास (८३.३३%) तिसऱ्या परीक्षेत २१८ पैकी १४१ पास (६४.६७%)

२. राष्ट्रभाषा हिंदी बालबोधिनी ६३ पैकी ५५ पास (९६.४९%), प्राथमिक ७३ पैकी ७३ पास निकाल १००% व प्रवेशिका ६७ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. निकाल ९५.३% संस्कृत तृतिया १५० विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या. निकाल १००%

३. इंग्रजी बाह्य परीक्षा : प्रि. इलिमेंटरी : एकूण ९२ विद्यार्थिंनी प्रविष्ट झालेल्या होत्या.

४. एलिमेंटरी परीक्षेस १९१ विद्यार्थिनी प्रविष्ट झालेल्या होत्या व ज्युनिअरसाठी ५४ विद्यार्थिंनी प्रविष्ट झालेल्या होत्या. सर्व विद्यार्थिंनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या.

५. गांधर्व महाविद्यालय संगीत परीक्षा एकूण ७ प्रविष्ट व निकाल १००%

६. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा ६ वी व ९ वीमधील एकूण ११ विद्यार्थिंनी प्रविष्ट झाल्या. कु. नेहा रामचंद्र पाटील हिला विशेष प्राविण्य प्राप्त झालेले आहे.

७. सकाळ चित्रकला स्पर्धा, कॅमल चित्रकला स्पर्धा, एडस् निर्मूलन दिनानिमित्य आयोजित चित्रकला स्पर्धा व अपंग सप्ताहनिमित्य आयोजित चित्रकला स्पर्धा या प्रकारच्या विविध स्पर्धेत विद्यार्थिनींनी भरघोस यश संपादन केले.

८. इलिमेंटरी ग्रेड परीक्षेचा निकाल १००% व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल ९०% लागला आहे.

असे सुयश विद्यार्थिनीनी मिळविले.

## स्पर्धा विभाग

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना संधी देऊन त्यांच्यातील कला कौशल्यांना विकसित करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. हस्ताक्षर, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, हस्तलिखित, स्वरचित काव्य तसेच पाठांतर, नाट्यवाचन, एकांकिका, समूहगीत या स्पर्धा शालेयस्तरावर घेतल्या गेल्या. तसेच बाह्य स्पर्धांमध्येही विद्यार्थिनींनी पारितोषिके मिळविली.

छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्य मराठी निबंध स्पर्धा, जागतिक लोकसंख्या दिन प्रश्नमंजूषा स्पर्धा, अंधश्रद्धा निर्मूलन निबंध स्पर्धा, मुख्याध्यापक संघ नाट्यछटा स्पर्धा जायंटस ग्रुप ऑफ कोल्हापूर वक्तृत्व प्रश्न मंजूषा व संस्कृत कथाकथन स्पर्धा प्रि. इंदूमतीदेवी स्मृति वक्तृत्व स्पर्धा, मुख्याध्यापक संघ, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंटल व लायन्स क्लब ऑफ कोल्हापूर आयोजित जिल्हास्तरीय आंतरशालेय नाट्यवाचन, नाट्यछटा, संस्कृत मराठी संगीत नाट्यप्रवेश स्पर्धा, जिल्हाधिकारी श्रीनिवास ढाल समूहगीत स्पर्धा, मूलभूत कर्तव्ये या विषयावर आधारीत निबंध स्पर्धा सकाळ वेध करीअरचा निबंध स्पर्धा अशा अनेक बाह्य स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले.

## एन.सी.सी.

दरवर्षी प्रमाणे इ. ८ वी, ९ वीच्या मिळून १०० विद्यार्थिनी एन.सी.सी. मध्ये आहेत. इ. ८ वी च्या ४३ व इ. ९ वीच्या ५७ विद्यार्थिनी आहेत.

१. आपल्या शाळेतील ए.टी.सी.कॅम्प २, आर.डी.सी. कॅम्प साठी २ विद्यार्थिनिंनी सहभाग घेतला.

२. एन. आय. सी कँम साठी २ विद्यार्थिनिंनी सहभाग घेतला.

३. एन. आय. सी. कॅम्पसाठी ३ विद्यार्थिनींची निवड झाली.

याप्रमाणेच एम. सी. सी. आर. एस. पी. व गर्ल गाईड हा अभ्यासक्रम घेतला जातो.

## जिमखाना विभाग – क्रीडा विभाग

जुलै २०१५ मध्ये शालेय जिमखाना निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने उत्साहात पार पडली. यामध्ये जनरल सेक्रटरी पदासाठी कु. गायत्री भोसले इ. १० वी ड व उपजनरल सेक्रेटरी पदासाठी कु. सबा मणेर १० वी ई या दोन विद्यार्थिनींची निवड झाली.

शालेय शासकीय स्पर्धांना सुरुवात झाली. यामध्ये आमच्या शाळेने सांघिक व वैयक्तिक खेळामध्ये सहभाग घेऊन उत्तम प्रतीचे यश मिळविले.

क्रीडा क्षेत्रातील प्रावीण्य हे तर आमच्या शाळेचे खास वैशिष्ट्य आहे. मुलींच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांचा शारीरिक विकास व्हावा ही आज काळाची गरज बनत चालली आहे. शालेय विषयाला खेळाची जोड असलीच पाहिजे. चालूवर्षी आमच्या शाळेने सांघिक व वैयक्तिक खेळांमध्ये भाग घेवून भरघोस यश संपादन केले आहे. कु. तेजस्विनी रविंद्र पाटील हिचा इंफाळ, मणिपूर येथे झालेल्या १७ वर्षाखालिल राष्ट्रीय फुटबॉल क्रीडा स्पर्धे करीता निवड झाली.

## रणरागिणी स्पोर्टस् क्लब

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने संस्थेतील सर्व शाखेतील सर्व खेळाडू विद्यार्थिनींना तंत्रशुद्ध मार्गदर्शन करण्यासाठी रणरागिणी स्पोटर्स क्लब चालविला जातो. यामध्ये सर्व खेळांचे मार्गदर्शन केले जाते. यामध्ये ४० खेळाडू खेळांचा सराव करतात. सकाळी ७ ते ९ या वेळेत हा सराव केल्याने घवघवीत यश संपादन केले आहे. विविध खेळामध्ये भाग घेवून शहर स्तर जिल्हा स्तर, विभागीय स्तर, राज्य व राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे.

रणरागिणी स्पोर्टस् क्लबचे कामकाज श्री. मासाळ सर, श्री. सूर्यवंशी, श्री. एस. के. मासाळ, सौ. व्ही. डी. जेमनिस, श्री. आर. बी. पाटील व सौ. एस. डी. चव्हाण पाहतात.

## सहल विभाग

अहवाल सालात सहल कास पठार, जेजूरी व कणेरीमठ येथे शिक्षकांसह गेली. या सहलींचा शैक्षणिक, भौगोलिक मनोरंजनात्मक दृष्टिकोनातून फारच उपयोग झाला.

## अभ्यासेतर उपक्रम

आमच्या विद्यार्थिनींनी अभ्यासाबरोबर नितीमत्ता वाढविणारे मूल्यशिक्षण नियमीतपणे विविध उपक्रमातून दिले जाते. अफाट विश्वाची कांही अंशी माहिती असावी या उद्देशाने सामान्यज्ञान, पर्यावरण हे विषय शिकवीले जातात.

## विज्ञान मंडळ

इ. ८ वी साठी जैवविविधता या विषयावर निसर्ग मित्र श्री. अनिल चौगुले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते. जीवनकल्याण हायस्कूल येथे संपन्न झालेल्या विज्ञान वक्तृत्व स्पर्धेमध्ये शाळेच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या. बाल विज्ञान परीषद राज्यस्तरासाठी शाळेची निवड झाली. विज्ञान मंडळाची सहल भारतीय संस्कृती महोत्सव पाहण्यासाठी कणेरी मठ येथे आयोजित करण्यात आलेली होती.

## पालक शिक्षक संपर्क समिती व पालक मेळावे

सन २०१३-१४ व २०१४-१५ साठी नियुक्त केलेल्या उषाराजे हायस्कूलमधील पालक शिक्षक संपर्क समितीचे कामकाज योग्य तऱ्हेने पार पडले. वेळोवेळी घेतलेल्या सभेमधून पालक शिक्षक संपर्क समितीच्या कामकाजाचा आढावा तसेच विद्यार्थिनी व शालेय प्रगती संदर्भात चर्चा, शिक्षण व्यवस्थेतील बदलते प्रवाह, शाळेची परंपरा इतिहास, शालेय शिस्त अभ्यास व अभ्यासेतर उपक्रम या विषयी पालकांना माहिती सांगितली गेली. पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालक शिक्षक संपर्क समितीचे सदस्य माजी नगरसेवक श्री. सुरेक्ष ढोणुक्षे यांनी रू. ५०००/- मदत देणगी स्वरूपात केली.

## व्यवसाय मार्गदर्शन

भवानी महोत्सव अंतर्गत मातृदिन व हळदीकूंकू समारंभाचे औचित्य साधून व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रदर्शन भरविणेत आले. यामध्ये स्त्रीयांसाठी असलेले विविध उद्योगधंदे व माहितीचे तक्ते याद्वारे माहिती देणेत आली. तसेच माता पालकांनीही या प्रदर्शनाला भेट देऊन विविध कोर्सची माहिती करून घेतली. १४ जानेवारी हा व्यवसाय मार्गदर्शन दिन साजरा करणेत आला.

## संगणक

संगणक या विषयासाठी शाळेच्या इ. ५ वी ते १० मधील १८३३ विद्यार्थीनी संगणक प्रशिक्षण घेत आहेत. संगणक विभागामध्ये एकूण २१ संगणक उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींना भरपूर सराव मिळतो.

## परीक्षा विभाग

इ. ५ वी ते ८ वी साठी शासनाच्या नवीन धोरणानुसार संकलित व अकारीक मुल्यमानानुसार परीक्षा घेतल्या गेल्या तसेच शिक्षण संहितेनुसार इ. ९ वी व १० वीच्या सर्वच परीक्षा उत्तमरितीने पार पडल्या.

## शो- केस विभाग

वर्षातील ऋतुंचे, सणांचे औचित्य साधून शो केस विभाग कार्यरत होता. यामध्ये विद्यार्थिनींनी केलेल्या कविता, तसेच विविध थोरा मोठ्यांबद्दलची माहिती. चरित्रे, वर्तमान पत्रातील महत्त्वाची कात्रणे, शाळेतील विविध कार्यक्रमाची माहिती, विद्यार्थिनी लिखीत कथा, चित्रे या विविध उपक्रमांची माहिती नियमितपणे शो केस मध्ये लावण्यात आली. शो केस विभागाची नियमितपणे देखभाल आहे. शो केस नियमितपणे विविध माहितींनी समृद्ध असलेल्या दिसतात.

## हस्तलिखित विभाग

